
मूल्य ₹ १५/-

# हसती दुनिया

(मराठी)

अंक १२ • वर्ष १६ वे • पृष्ठे ५२ • डिसेंबर - २०१९



# हसती दुनिया (मराठी)

अंक १२ • वर्ष १६ वे • पृष्ठे ५२ • डिसेंबर २०१९

**बालकांच्या बौद्धिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट**

(पंजाबी, इंग्रजी व हिंदी भाषेतसुध्दा प्रकाशित)

संपादक
राजेंद्र थोरात
(अवैतनिक)

सहसंपादक
सुरेश तिर्लोटकर

सजावट व चित्रे
स्वप्निल वि. न्हाटवळ
राजनंदन कृ. पिंपळकर • श्रीकांत द. पाटील

संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक व प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी ही हसती दुनिया पत्रिका एम.पी.प्रिंटर्स, बी-२२०, फेस-II, नोएडा-२०१३०५, जिल्हा-गौतम बुध्द नगर (उत्तर प्रदेश) येथे छापून संत निरंकारी भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई - ४०० ०१४. येथे प्रकाशित केली.

कार्यालयाचा पत्ता
५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४
ई-मेल marathihastiduniya@gmail.com
Website : www.nirankari.org

लेखकांच्या मताशी सहमत असणे अनिवार्य नाही


| देश | 1 वर्ष | 3 वर्ष | 5 वर्ष | 11 वर्ष |
|---|---|---|---|---|
| भारत/नेपाळ | ₹ 150 | ₹ 400 | ₹ 700 | ₹ 1500 |
| यू.के. | £ 15 | £ 40 | £ 70 | £ 150 |
| यूरोप | € 20 | € 55 | € 95 | € 200 |
| अमेरिका | $ 25 | $ 70 | $ 120 | $ 250 |
| कॅनडा/ऑस्ट्रेलिया | $ 30 | $ 85 | $ 140 | $ 300 |


मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९








## स्तंभ


- दोन शब्द ०४
- दादाला विचारु या १०
- विचारपुष्प १२
- शब्दकोडे १४
- आरोग्याचा मंत्र २२
- वाढदिवसाच्या शुभेच्छा २६
- वैज्ञानिक प्रश्नोत्तरे २७
- दिव्यवाणी ३१
- हसा मुलांनो हसा ३२
- सामान्य ज्ञान ४८
- चित्र काढा आणि रंग भरा ५०


## चित्रकथा


- आजोबा १६
- किट्टी ३८




## विशेष व प्रेरक प्रसंग


- व्यक्तिविशेष ०७
- अजरामर गायक - मोहम्मद रफी ०८
- दिन विशेष - नाताळ ११
- भ्रमंती - कळसूबाई २८
- समर्थ दर्शन -भाग ६२ ३४
- तेजस्विनी - शांताबाई शेळके ३७
- आपले जिल्हे - सोलापूर ४५
- पक्षीजगत - लाजाळू रानकवडा ४९








## कथा


- अधर्माचा परिणाम ०५
- ९९ - चा फेरा २०
- साधुबोध २४
- खरी शिकवण मिळाली ४२
- चांगली अद्दल घडली ४३








## कविता


- सुंदर असावं गाव १५
- निरोप या वर्षाला ३६
- आपलं तिकडं लक्ष नसतं ४७

# सद्सद्विवेक

पं. मदन मोहन मालवीय फार मोठे समाजसुधारक होते. त्यांच्या जीवनातील हा एक प्रसंग आहे. एकदा ते वाराणसीहून अलाहाबादला जाण्यासाठी निघाले. गाडीची वेळ होत आली. गाडी पकडण्यासाठी ते वाराणसी स्टेशनवर धापा टाकत पोहचले. गाडी सुटणार तेवढ्यात त्यांनी कसाबसा डबा गाठला आणि सीटवर जाऊन बसले; पण या गडबडीत त्यांना तिकीट काही काढता आले नाही. अलाहाबाद स्थानकावर उतरुन त्यांनी तिकीट तपासनिसांना आपली अडचण सांगितली. तिकीट तपासनिस म्हणाले, "आम्ही तुम्हाला ओळखतो, तुम्ही खुशाल स्टेशनबाहेर पडा." परंतु मालवीयजींच्या सद्सद्विवेक बुध्दीला मात्र ही गोष्ट काही पटेना. ते म्हणाले,"तुम्ही माझ्याकडून तिकिटाचे पैसे घ्या." त्यावर तपासणीस म्हणाले, "मग विनातिकिट प्रवास केल्याचा दंडही तुम्हाला भरावा लागेल." परंतु मालवीयजी या गोष्टीलाही तयार नव्हते. शेवटी त्यांनी अलाहाबाद ते वाराणसी तिकिट काढले आणि तिकिटतपासणीसासमोर त्याचे तुकडे केले, मगच ते स्टेशन बाहेर पडले.

क्षुद्र स्वार्थासाठी जी माणसं तत्त्वाशी तडजोड करत नाहीत, त्यांच्या वर्तनाला सद्सद्विवेक म्हणतात. जे योग्य आहे त्याला योग्यच म्हणायचं. जे अयोग्य आहे त्याचा स्वीकार कटाक्षाने टाळायचा हा त्यांचा नियमच असतो. सत्य-असत्य, खरं-खोटं पारखून सत्य-खरं तेच निवडणारे 'विवेकी' पुरुष हे संत-महात्मा, महापुरुष म्हणून ओळखले जातात. विवेकी पुरुष प्रसंगी नुकसान सोसूनही सत्यापासून दूर जात नाहीत. सत्याने चालणाऱ्यांचं जीवन निर्मळ, शांत, निर्वैर आणि पवित्र असतं. अप्रामाणिक वागणारी माणसं सदैव चिंताग्रस्त, दुःखी आणि अशांत असतात. कारण विवेक बुध्दीशी त्यांनी प्रतारणा केलेली असते. म्हणूनच सुखी-समाधानी राहायचं असेल, मन:शांती मिळवायची असेल तर बुध्दीला विवेकाची जोड मिळायला हवी. खरं तर माणसाचा मूळ स्वभाव हा विवेकशील आहे; परंतु अनेकदा छोट्या-छोट्या स्वार्थासाठी मनुष्य खोटं बोलतो. फसवणूक करतो. दुसऱ्याचं नुकसान करतो. परिणामी संपूर्ण जीवनच दुःखी बनतं. तर मग हा 'विवेक' प्राप्त कसा होईल?...तर सत्य-असत्याची ओळख झाल्यावर. यासाठी एकच मार्ग आहे, सत्संग! संतांनी म्हटलय - 'बिनु सतसंग विवेक न होई'

सरत्या वर्षाला निरोप देताना वर्षभरात ज्या काही चुका आमच्या हातून कळत-नकळतपणे घडल्या त्या सुधारण्यासाठी नवीन वर्षात पदार्पण करताना प्रण करु या, की प्रत्येक गोष्ट आम्ही सद्सद्विवेक बुध्दीनेच करु. विवेक जागृत करण्यासाठी सत्संगाचा नित्य आधार घेऊ.

- राजेंद्र थोरात





# अधर्माचा परिणाम

जनपदात राहणारा वृध्द ब्राह्मण एकदा आपल्या मृत बालकाला घेऊन श्रीरामांच्या राजद्वाराशी आला आणि मोठ्यामोठ्याने शोक करु लागला,

"अरेरे, पूर्वजन्मी मी असं कोणतं पाप केलं होतं, की माझ्या एकुलत्या एका पुत्राचा मृत्यू मला पाहावा लागला. माझ्या जीवनाचा आधारच गेला . मुला, तुझ्या शोकानं मी आणि तुझी माता दोघेही थोड्याच दिवसांत मरुन जाऊ. श्रीरामांच्या राज्यात तर अकाली मृत्यूची असली भयंकर घटना यापूर्वी कधी पाहण्यात आली नव्हती. ऐकण्यातही आली नव्हती.

राजन, अकाली मृत्युमुखी पडलेल्या माझ्या या बालकाला जिवंत करा. नाहीतर या राजद्वारावर एखाद्या अनाथाप्रमाणे मी प्राणत्याग करीन. नगरात किंवा राज्यात कुठंतरी राजाकडून एखादा अपराध किंवा अनाचार घडल्यामुळेच केवळ हा बालमृत्यू घडला असेल असे मला वाटते." या घटनेमुळे श्रीराम चिंतित झाले. त्यांनी वरिष्ठ मंत्रिगण, वसिष्ठ, व अन्य ऋषिगण, सचिव, विद्वान, महाजन यांची सभा बोलावली व त्या सभेसमोर ही समस्या मांडली. तेव्हा महर्षी नारददेखील उपस्थित होते. ते म्हणाले,

"राजा, पूर्वी सत्ययुगात ब्राह्मणच तपाचरण करीत. ते युग तपस्येच्या तेजानं प्रकाशमान होतं. तेव्हा अकाली मृत्यू होत नव्हता."

"त्रेतायुगात क्षत्रियांना प्राधान्य आलं. ब्राह्मणांबरोबर क्षत्रियदेखील तप:साधना करु लागले. ब्राह्मणांइतकेच क्षत्रियांना महत्त्व आले. सत्ययुगात कृषिकर्म जरी दुय्यम असलं तरी ते उपजीविकेचे एक महत्त्वाचे साधन होते. कृषिकर्म व पर्यायाने भौतिक संपन्नता महत्त्वाची ठरू लागली व त्यातून अनाचार, भ्रष्टता, अधर्म यांना हळू हळू शिरकाव मिळाला." श्रीरामांनी लक्ष्मणाला बोलावले व म्हटले,

"लक्ष्मणा, त्या वृध्द ब्राह्मणाचे सांत्वन कर. त्या मृत बालकाचे शरीर उत्तम गंधयुक्त तेलानं भरलेल्या मोठ्या द्रोणात बुडवून ठेव. त्यामुळे ते शरीर क्षीण व नष्ट होणार नाही." श्रीरामांनी पुष्पक विमान बोलावले व त्यातून आकाशसंचाराला सुरवात केली. सर्व दिशांना शोध घेत असताना शैवलपर्वताच्या उत्तर भागात त्यांना एक महान सरोवर दिसले. त्या सरोवराच्या तीरावर एक तपस्वी तप:साधना करीत होता. तो खाली मुख करुन लोंबकळत होता. श्रीराम त्याच्यापाशी गेले व त्याच्या तप:साधनेविषयी बारकाईने चौकशी करू लागले. तेव्हा समजले, की ह्या तपस्वीचे नाव शंबुक आहे. तो शूद्रयोनीत जन्मला आहे आणि सदेह स्वर्गलोकी जाऊन देवलोकावर विजय मिळवण्याची त्याची प्रतिज्ञा आहे. तेव्हा श्रीरामांनी शंबुकाचा शिरच्छेद केला. सर्व देवांना धन्यता वाटली. त्यांनी प्रसन्न होऊन श्रीरामांना वर मागण्यास सांगितले. तेव्हा श्रीराम म्हणाले, "त्या वृध्द ब्राह्मणाचा एकुलता एक पुत्र अकाली मरण पावला आहे. त्या मृत बालकाला जिवंत करा, एवढाच वर मागत आहे." त्याप्रमाणे ते मृत बालक जिवंत झाले व आपल्या कुटुंब परिवारात पोहोचले.

महर्षी अगस्त्यांनी जलशय्या व्रताचा स्वीकार केला होता व त्या दिवशी व्रताची सांगता होती. सर्व देव अगस्त्य मुनींच्या दर्शनासाठी व त्यांच्या कठोर व्रताच्या सांगतेबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यासाठी निघाले होते. श्रीरामदेखील मग पुष्पक विमानात साऱ्या देवांना घेऊन अगस्त्यमुनींच्या दर्शनासाठी निघाले. अगस्त्यमुनींचे दर्शन-पूजा-प्रसाद ग्रहण करुन सारे देव परत देवलोकी निघून गेले. श्रीरामांना मात्र अगस्त्यमुनींनी आग्रहपूर्वक एक रात्र आपल्याकडेच ठेवून घेतले. श्रीरामांना विनंती केल्यावर व उत्सुकता दर्शवल्यावर काही उद्‌बोधनपर गोष्टी अगस्त्यमुनींनी श्रीरामांना सांगितल्या. ते म्हणाले,

"रघुनंदना, पूर्वी ब्रह्मस्वरुप सत्ययुगात सारी प्रजा राजाविनाच होती. मग पुढे इंद्राला देवांचा राजा करण्यात आले. तेव्हा सारी प्रजा देवदेवेश्वर ब्रह्मदेवापाशी गेली व तिने आपल्यातील एका श्रेष्ठ पुरुषाला राजा करावं. अशी मागणी केली.

ब्रह्मदेवांनी मग इंद्रासह समस्त लोकपालांना बोलावून घेतले व त्यांच्याकडून त्यांच्या तेजाचा एकेक भाग ब्रह्मदेवांना समर्पित केला. एवढे झाल्यावर ब्रह्मदेवांना शिंक आली आणि त्या शिंकेतून क्षुप नावाचा राजा निर्माण झाला. हा राजा लोकपालांनी दिलेल्या तेजाच्या सर्व भागांनी परिपूर्ण होता. ब्रह्मदेवाने मग प्रजाजनांच्या मागणीनुसार त्या क्षुपाचीच प्रजापालक नरेश म्हणून नेमणूक केली. क्षुप राजा झाला. त्याने इंद्राकडून मिळालेल्या तेजोभागाने पृथ्वीवर राज्य केलं. वरुणाच्या तेजोभागाने त्याने राज्यशकट चालविण्यासाठी उत्तम धनसंग्रह केला. तसेच यमाच्या तेजोभागाचा वापर करुन तो अपराधी प्रजाजनांना शिक्षा व दंड करीत असे." शेवटी अगस्त्य मुनी श्रीरामांना म्हणाले,

"रघुनाथा, तुम्हीदेखील असेच आदर्श राज्यप्रशासन चालवावे, हा आमचा आशीर्वाद आहे."

क्रमश:

# डॉ. बाबासाहेबांना आंबेडकर
## हे आडनाव कसे मिळाले?

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मूळ गाव कोकणातील आंबडवे व मूळ आडनाव सकपाळ होते. कोकणामधील लोक पूर्वी आडनाव आपल्या गावाच्या नावावरून ठेवत असत व त्यात शेवटी कर शब्द जोडण्याचा प्रघात असे. त्यामुळेच बाबासाहेबांचे आडनाव सकपाळ असतांना त्यांचे वडील रामजी आंबेडकर यांनी सातारा येथील गव्हर्नमेंट हायस्कूल (आताचे प्रतापसिंह हायस्कूल) मध्ये 'आंबडवेकर' असे आडनाव ७ नोव्हेंबर १९०० रोजी नोंदवले.




डॉ. बाबासाहेबांना आंबेडकर हे आडनाव सुद्धा याच शाळेत मिळाले. स्वत:च्या शिदोरीतील घास प्रेमाने देणारे कृष्णाजी केशव आंबेडकर सारखे शिक्षकही येथेच त्यांना भेटले. त्यांचे आडनावही त्यांच्या आंबेड या गावावरून तयार झाले होते. आंबेडकर हे आडनाव सुटसुटीत वाटल्याने आंबेडकर गुरुजींनी बाबासाहेबांना पण हेच अडनाव लावण्यास सुचवले. तो पर्याय योग्य वाटल्याने शाळेतील दाखल खारीज रजिस्टर मध्ये १९१४ क्रमांकावर तसे नोंदवण्यात आले. शाळेत येण्यापूर्वी त्यांच्या वडिलांनी त्यांचे काही शिक्षण घरीच घेतले होते. त्यामुळे बाबासाहेब शाळेच्या त्या रजिस्टरमध्ये मोडी लिपीमधील स्वाक्षरी करू शकले, लहानपणी त्यांचे नाव भीमा/भिवा असे होते. "भिवा रामजी आंबेडकर" अशी स्वाक्षरी असलेले ते रजिस्टर शाळेने प्राणपणाने जपून व लॅमिनेशन करुन ठेवले आहे. अभ्यागतांसाठी झेरॉक्स केलेल्या स्वरूपातील प्रत तयार केलेली आहे. आंबेडकर गुरुजी मंगळवार पेठेतील व्यंकटपुरात राहत. कृष्णाजी गुरुजी ७९ वर्षे जगले. हयात आंबेडकर कुटुंबातील कुणीही गुरुजींना पाहिलेले नाही; पण त्यांच्या आठवणी मौखिक परंपरेने या कुटुंबानं कायम जिंवत ठेवल्या आहेत. आंबेडकर कुटुंबाकडे कृष्णाजी गुरुजींचं छायाचित्रं आणि पत्रांचा जो ऐतिहासिक ठेवा होता, तो त्यांनी पुण्यातील सिम्बॉयसिस वस्तुसंग्रहास दान करून टाकला.

कृष्णाजी केशव आंबेडकर गुरुजी मूळचे रत्नागिरी जवळील 'वांद्री'गावचे. त्यांना पेशव्यांनी "आंबेड' गावाचे वतन दिल्याने त्यांना 'आंबेडकर' आडनाव पडले. आंबेडकर'कुटुंब देवरुखे ब्राह्मण. त्यांचा दृष्टिकोन विशाल होता.

❖❖❖

## अजरामर गायक

# मोहम्मद रफी



गरिबोंकी सुनो वो तुम्हारी सुनेगा', 'तुम एक पैसा दोगे वो दस लाख देगा' कधी असे भिकाऱ्याच्या करुणामय आर्त स्वरात तर कधी 'जाने वालो जरा होशियार, यहाँके हम हैं राजकुमार' या सारखी उडत्या चालींची, मस्त मूडमधील गाणी स्वर्गीय मोहम्मद रफींनी गायली आहेत. कधी प्रेयसीला छेडणारा प्रियकर तर कधी देशाची गाणी गाणारा देशभक्त, तर कधी कव्वालीची मधुरता कमालीची वाढविणारा कव्वाल, अशा अनेक भावभावनांच्या छटांचे पिसार आपल्या सुस्वरांतूने महान गायक मोहम्मद रफींनी फुलवले.

मोहम्मद रफींचा जन्म २४ डिसेंबर १९२४ मध्ये अमृतसर जिल्ह्यातील कोटला सुलतानसिंह नावाच्या गावात झाला. अगदी लहानपणापासूनच त्यांना गुणगुणायची सवय होती. त्यांचा हा छंद पाहून त्यांच्या मोठ्या हमीदभाईंनी त्यांना अगदी मनापासून प्रेरणा, प्रोत्साहन देण्यास सुरुवात केली. पुढे हमीदभाईंनी रफींना बडे गुलाम अली खाँ साहेब, उस्ताद खान, अब्दुल वहिद साहेब इत्यादी विभूतींकडे गायनाचे धडे दिले. एकदा लाहोरमध्ये प्रसिध्द गायक कुंदनलाल सैगल यांचा गाण्याचा कार्यक्रम होता. त्यामुळे रफींना त्या कार्यक्रमात गाण्याची चुकून संधी मिळाली आणि काय आश्चर्य! कुंदनलाल सैगलनी रफींना मनापासून आशीर्वाद देताना सांगितले. एक दिवस तू मोठा गायक होशील यात शंकाच नाही.

मोहम्मद रफींनी आपले पहिले गाणे लाहोरमध्ये गायले. त्या गाण्याचे संगीतकार शामसुंदर होते. त्या पंजाबी चित्रपटाचे नाव 'गुलाबलोच' असे होते. पुढे सन १९४८ मध्ये महात्मा गांधीजींची हत्या झाल्यावर गीतकार राजेंद्रकृष्ण यांनी रात्रभर जागून 'सुनो सुनो ओ दुनियावालो बापूकी अमर कहानी' हे गाणे तयार केले आणि हे गाणे मोहम्मद रफींनी गाऊन भारतीय चित्रपटसृष्टीला आपली एक खास वेगळ्या पध्दतीची ओळख करुन दिली. त्यानंतर हमीदभाईंनी रफींना मिनर्व्हा मुव्ही टोनमध्ये जाऊन मीर साहेबांना भेटायला सांगितले. त्यावेळी रफींकडे बसने प्रवास करण्यासाठी खिशात पैसेही नव्हते. त्यावेळी 'दिल्लगी'चे निर्माण चालू होते. त्यामध्ये रफींनी नौशाद साहेबांच्या दिग्दर्शनाखाली गाणी गायली. 'तेरे कुचे में अरमानोंकी दुनिया लेके आया ' आणि

'इस दुनियामें ऐ दिलवाले दिल का लगाना खेल नही ' या दोन्ही गाण्यांनी भारतभर धमाका उडवला. प्रत्येकाच्या तोंडी 'बैजू बावरा 'ची गाणी त्यावेळी होती. प्रत्येक प्रियकर आपल्या प्रेयसीला पत्रातून लिहू लागाला. गुणगुणू लागला. 'तू गंगा की मौज मैं जमुना की धारा हो रहेगा मिलन ये हमारा तुम्हारा...'

आपल्या संगीत प्रवासात मोहम्मद रफींनी सर्वच संगीतकारांबरोबर गाणी गायली आणि सर्व कलाकारांना आपला आवाज दिला. रफींच्या गाण्याचे एक वैशिष्ट्य म्हणजे ज्या कलाकारांसाठी गाणे गायचे त्या कलाकाराच्या आवाजामध्ये आपला आवाज फिट बसवीत. दिलीपकुमारसाठी ज्यावेळी रफी गात त्यावेळी असे वाटे की दिलीफकुमार स्वत: गात आहेत. त्या उलट मोहम्मद रफी जॉनी वॉकरसाठी विनोदी गाणे गायचे त्यावेळी असे वाटायचे की जॉनी वॉकरच गात आहे.

मोहम्मद रफी मितभाषी होते. खूप कमी बोलणारे होते. त्यांच्याबद्दल चित्रपटसृष्टीत कुणालाही कोणत्याही प्रकारची तक्रार नव्हती. 'रागिणी' तील 'मन मोरा बावरा' हे गाणे त्यांनी त्यांचे समकालीन प्रसिध्द गायक किशोरकुमारसाठी गायले होते. राज कपूरचा आवाज म्हणजेच मुकेश असे समीकरण जरी असेल तरी मोहम्मद रफींनी राज कपूर यांच्यासाठी गाणी म्हटली ती खूपच लोकप्रिय झाली. त्यापैकी बरसात मधील मै जिंदगी में हरदम रोताही रहा हूँ हे गीत होते. मोहम्मद रफींनी सर्वात जास्त गाणी नौशादसाहेब व लक्ष्मीकांत प्यारेलाल यांच्यासाठी गायली.

❖❖❖



- सेवा लहान किंवा मोठी नसते.जर आपण सेवा करत आहोत आणि मनामध्ये अहंकार असेल तर ती सेवा व्यर्थ ठरते. सेवा ही नेहमी समर्पित भावनेने केली जाते.
- निरंकाराचा जिथे वास असेल तिथे अभिमान राहू शकत नाही आणि जर अभिमान वास करत असेल तर तिथे निरंकार राहू शकत नाही.जी सेवा विनम्रतेने केली जाते तीच सेवा सार्थक ठरु शकते.
- सेवा करताना जर कटू वचन निघाले अथवा आपली वैचारिक दृष्टी जर दूषित झाली तर ती सेवाही व्यर्थच आहे.
- जेवढे आपण अहंकारापासून अलिप्त राहू, जीवनात तेवढाच फायदा आहे. अहंकाराचा भाव सेवेच्या मैदानात कधीही नसावा.
- सेवा करणारा कधीच प्रशंसेची अपेक्षा करत नाही. तो समर्पित अशा सेवाभावात तल्लीन राहतो. असाच कृतज्ञतेचाही भाव प्रबळ राहो.
- जिथे जिथे सेवेचे नाव घेतले जाते तेथे तन्मयता आणि अनुशासनाचं एक विशेष महत्त्व राखलं जातं. चेतनतेबरोबर सेवेमध्ये योगदान द्यावं.

❖❖❖

# दादाला विचारू या..!

**प्रश्न :- भक्त कोणत्या कारणांमुळे ईश्वरापासून दूर होऊ शकतो?**

**उत्तर :** धनाचा लोभ आणि लौकिकाची (प्रसिध्दीची) लालसा यामुळे भक्त ईश्वरापासून दूर होतो.

**प्रश्न :- 'ज्ञानी हो सो चेतन हो' ज्ञानी माणसाने सदैव सजग, सावध रहावे असे का म्हटले आहे?**

**उत्तर :-** ज्ञानाचा अभिमान ज्याला झाला तो पतनाच्या दिशेने जाऊ लागतो. ज्ञानी भक्ताच्या दृष्टीत सर्वत्र ईश्वराचच रुप सामावलेलं दिसतं. परंतु स्तुती-निंदा यामुळे प्रभावित होऊन जर कोणी स्वत:ला श्रेष्ठ व इतरांना हीन समजू लागला तर ते भक्तासाठी फार नुकसानदायी ठरु शकतं. ज्ञानी भक्त स्तुती-निंदा, लाभ-हानी, जय-पराजय यात नेहमी स्थिरचित्त असतो. काही वेळा असा भक्त कुणी निंदा केली तरी सहन करतो; परंतु कुणी स्तुती केली तर मात्र ती स्तुती पचवू शकत नाही. स्वकर्तृत्वाचा त्याला अभिमान येऊ शकतो. म्हणून जो काही लौकीक प्राप्त होतो, तो सद्‌गुरुच्या कृपेने होतो असे जर त्याला मन:पूर्वक वाटत असेल तर प्रत्येक यशाचं श्रेय तो सद्‌गुरुला देतो आणि अभिमानापासून वाचू शकतो. म्हणून ज्ञानी भक्ताने सदैव सजग-सावध रहावं असं म्हटलं जातं.

**प्रश्न :- मनुष्य हा देहाने माणूस असूनही त्याला 'मनुर्भव' म्हणजे 'माणूस बन' असे का म्हटले आहे?**

**उत्तर :** प्रत्येक प्राणिमात्राचा एक धर्म असतो. त्यानुसार पशू-पक्षी इत्यादी जडजीव आपापला धर्म निभावत असतात; परंतु मनुष्य जेव्हा आपला मानवधर्म विसरुन पशूवृत्तीने वागू लागतो, दानवता धारण करतो. वैर,द्वेष, हिंसा, लोभ, लालसेने ग्रसित होता, तेव्हा तो देहाने माणूस असूनही खरा माणूस नसतो; परंतु जेव्हा त्याच्यात मानवता धर्माचे गुण दया, क्षमा, सहनशीलता, विशालता, प्रेम दिसू लागतात तेव्हा त्याला 'माणूस बन' असे सांगावे लागत नाही.

**प्रश्न :- एखादी व्यक्ती ईश्वरावर प्रेम करते हे ती केव्हा खात्रीने सांगू शकते?**

**उत्तर :** एखादी व्यक्ती जर असा दावा करत असेल, की मी ईश्वरावर प्रेम करतो; परंतु जवळच्या किंवा शेजाऱ्यांशी प्रेमाने वागत नसेल तर ती गोष्ट सत्य मानता येणार नाही.

ईश्वरावर प्रेम करणे याचा अर्थ ईश्वराच्या निर्मितीवर, ईश्वराने निर्माण केलेल्या जीवसृष्टीवर प्रेम करणे होय. जी व्यक्ती मुंगीपासून हत्तीपर्यंत सर्व प्राणी-पक्ष्यांमध्ये, वृक्षवल्लीमध्ये ईश्वराच्या अस्तित्वाची अनुभूती घेते, ती कुणाचाही तिरस्कार करणार नाही. जो सर्वाभूती एक ईश्वराला (सन्मुख सदा हरिला पाहे) आणि सर्व संत-महात्म्यांमध्ये सद्‌गुरुचं रुप पहातो तोच खरा ईश्वरप्रेमी भक्त होय.

a f

# नाताळ

भगवान येशू ख्रिस्तांच्या जन्मतारखे बाबत काहीसा विवाद आहे. इ.स. ३४५ मध्ये त्यावेळचे पोप पहिला ज्युलिअस यांनी २५ डिसेंबर हा येशूंचा जन्मदिवस मानावा असा निर्णय घेतला. या दिवशी ख्रिश्चन अनुयायी ख्रिसमस ट्री (सूचिपर्णी वृक्ष) सजवतात. दिव्यांची रोशणाई करतात. याच दिवशी सांताक्लॉज लहान मुलांसाठी भेटवस्तू वाटतो, असे मानले जाते.

या प्रसंगी चर्चमध्ये सायंकाळपासून प्रार्थना म्हणण्यात येते. लहान मुले घरोघरी जाऊन येशूची गाणी म्हणतात. त्यांना कॅरॉल असे म्हणतात.

भारतात तसेच अन्य देशांमध्ये ख्रिसमस हा सण वेगवेगळ्या पध्दतीने साजरा केला जातो.

- भारतात घरांमध्ये, शाळांमध्ये आणि कार्यालयांमध्ये ख्रिसमस उल्हासपूर्ण वातावरणात साजरा केला जातो. चर्च आणि बाजार सजवले जातात. चर्चमध्ये जाऊन मेणबत्त्या लावल्या जातात.
- जपानमध्ये ख्रिसमसला वेगळ्याच पध्दतीने साजरे केले जाते. जपानमधील लोक या दिवशी घरी राहून इंटरनेटवर स्वत:साठी उत्तम जोडीदार शोधतात. जोडीदार मिळाला तर त्याच्यासोबत ख्रिसमस साजरा करतात अन्यथा घरात बसून राहतात.
- फ्रांस देशात ख्रिसमसच्या सणाला चिमणीवर चप्पल अडकविण्याची प्रथा चालत आली आहे.
- ऑस्ट्रीयामध्ये ख्रिसमस निमित्त एका दानवाकडून मुलांना घाबरवले जाते आणि मारहाण केली जाते. हा काही दानव नसतो, मानवच असतो; पण तो मस्तीखोर मुलांना घाबरवतो. असे केल्याने दंगामस्ती करणाऱ्या मुलांमध्ये खूपच सुधारणा होते.
- स्पेनमध्ये ४ डिसेंबरपासूनच ख्रिसमस साजरा करायला सुरुवात होते. यावेळी स्पेनचे लोक आपल्या मित्रांना आणि नातलगांना भेटण्यासाठी एकमेकांच्या घरी जातात.
- नेदरलँडमध्ये ख्रिसमसच्या सणाला मुले सैंटाच्या रेंडियर्ससाठी आपल्या चपलांमध्ये गाजरे भरून ठेवतात.
- युक्रेनमध्ये ख्रिसमस ट्री(झाडावर) वर कोळीष्टके (कोष्ट्यांची जाळी) लावतात. या देशात ख्रिसमसनिमित्त १२ प्रकारची पक्वान्ने बनतात. मुलांना स्वयंपाकघरात येऊ दिले जात नाही. रात्रीच्या भोजनाच्या वेळीच या पक्वान्नांचा आस्वाद घेतला जातो. १२ प्रकारचे पदार्थ हे येशूच्या १२ शिष्यांचे प्रतीक होते.

❖❖❖





# विचारपुष्प

आपल्याला जे आयुष्य मिळालेले आहे याच्यामध्ये आपल्याला कर्म करण्याचं पूर्ण स्वातंत्र्य आहे. त्याचबरोबर प्रामाणिकपणाचीही शिकवण दिली जात आहे, आपण हे सत्य जाणलेलं आहे; की आपलं जीवन कसं असायला हवं? आपल्या मनातील भावनेपासूनच ही गोष्ट सुरु होते. जर आपण आपल्या मनामध्ये ही शिकवण, जी मानवी मूल्यांच्या रुपात आहे, की एकमेकांचे हित करणे, एकमेकांना आनंद देणे, प्रत्येकाच्या जीवनात समाधान प्रदान करणे सर्वांच्या भल्याची भावना बाळगून आपण कोणतंही कार्य करत असू तर तो हेतू फार महत्त्वाचा आहे. कर्म तर आपण करुच पण अगोदर त्याचा विचार करण्यापासून खरा प्रवास सुरु होतो. सत्कर्म करण्याची जी बाब आहे की, जीवनात आपण जेवढे या निरंकार प्रभूशी संलग्न होऊ तेवढीच आपली कर्मे चांगली होतील. आपल्याकडून काहीही चुकीचं कर्म घडणार नाहीत. निरंकार प्रभू-परमात्मा क्षणोक्षणी आपल्याला पाहत आहे अशा जागरुक अवस्थेत आपण स्वतः राहू, तेव्हा जाणून-बुजून कोणतीही चूक होणार नाही. याचाच अर्थ जेव्हा मनामध्ये केवळ चांगुलपणा असेल तेव्हा सत्कर्माच्या मार्गावर चालून आपण केवळ स्वतःचे जीवन सावरणार असे नसून इतरांनाही आनंद देऊ शकू. हेच सत्कर्म होय. ही गोष्ट आपल्याला आयुष्यात एक उत्तम जीवन जगण्याची कला प्रदान करील आणि नंतर प्रभुच्या दरबारातही, ही कामी येईल. जीवनात आपण जी कर्मे केली आहेत, त्यांच्या बाबतीत असेही म्हटले जाते की, वाईट कर्म एक वेगळ्या प्रकारची (लोखंडाची) बेडी आहे आणि चांगली कर्म सोन्याची बेडी आहे. बेडी ही शेवटी बेडीच आहे. प्रत्येक प्रकारच्या बेडीपासून आपण स्वतःचा बचाव करायचा आहे.

जेव्हा आपण स्वत: कर्म करत असू तेव्हा ती चांगली असोत अथवा वाईट, त्यांचे गाठोडे बरोबर घेऊन चालण्यासारखे आहे. परंतु, आपण पहिल्याच प्रणामध्ये तन-मन-धन परमात्म्याच्या प्रति समर्पित केले आहे. जे काही आहे ते यानेच दिले आहे, हे विचार, हे कर्म जे काही आहे ते करण्याची आमची योग्यता नाही. अशा भावनेने जेव्हा आपण राहू चांगली कर्मं आमच्याकडून होत जातील हीच चांगली कर्मं मृत्युसमयी आपल्याबरोबर येतील.

कभी किसी का बुरा सोचना
सब से बुरी बुराई है।
कहे 'हरदेव' भला कर सबका
इसमें तेरी भलाई है।


सर्वांचे भले करण्याची बाब आहे. कोणताही भेदभाव न करता प्रत्येकाच्या भल्याची भावना मनामध्ये असेल, मनामध्ये ज्ञानप्रकाश प्रज्ज्वलीत असेल तर मग तो प्रकाश कोणताही भेदभाव करणार नाही. केवळ अमूक व्यक्तीसाठीच प्रकाश आहे, इतरांसाठी नाही, असा विचार नसतो. प्रत्येक मनुष्य समान आहे, त्या प्रकाशात प्रत्येकजण सारखाच दिसणार आहे. आपणही आपल्या नजरेत कोणताही भेदभाव करायचा नाही. भाई कन्हैयांची सेवा-भक्तीची गाथा आपण जाणतो - युद्धाच्या मैदानात जेव्हा त्यांना सांगितले गेले की, आपण सेवा रुपात जखमींना हे पाणी पाजायचे आहे. तेव्हा त्यांनी ही आपली सेना आहे आणि ती शत्रू सेना आहे असा कोणताही भेदभाव केला नाही. सगळे आपलेच आहेत असेच त्यांना वाटले. ही जी आपुलकी आहे, हा जो आपुलकीचा भाव आहे त्या भावानेनं त्यांचीही (शत्रूसेनेची) सेवा केली गेली. तीच एक मुलभूत गोष्ट आहे, की ज्याअर्थी हा प्रभु-परमात्मा एक आहे आणि आपण सर्व त्याचीच लेकरे आहोत, मग आपण कितीही वेगवेगळे दिसत असू, सवयी वेगळ्या असतील, खाणे-पिणे-लेणे कोणतेही असो, राहण्याचा प्रांत, देश अशाप्रकारे कितीही वेगवेगळे दिसत असू तरीही ही जी ज्योत आहे आमच्यासमवेत, आपण स्वत:ला ज्याचे अंश मानत आहोत, परमात्म्याचा अंश असलेला हा आत्मा सर्वांभूती सारखाच आहे. तेव्हा कोणीही तशाप्रकारचा भेदभाव करु नये आणि स्वत:मध्येही सुधारणा कायम जपत आपण जो यथार्थ मार्ग आहे त्यावरच चालत राहावे. योग्य बोल बोलावे, आपले आचरण उत्तम ठेवावे. तेच आपले जीवन सुगंधीत करेल आणि विनम्रतेच्या दिशेनेही घेऊन जाईल.

आपल्या कर्मांवर अभिमान राहणार नाही. सर्व आपलेच आहेत अशी भावना बाळगण्याचे भाग्य आपल्याबरोबर राहील. दासी सर्वांकडून हीच एक कामना करते, की निरंकार प्रभुची जी ओळख आम्हाला झालेली आहे, त्याची जाणीव आपल्या कर्मांमध्ये सदोदित ठेवायची आहे. त्याचबरोबर स्वत:ला सेल्फ करेक्शन मोड (आत्मसुधार स्थिती) वर ठेवून प्रत्येक गोष्ट करायची आहे. त्याबरोबरच असाही प्रयास व्हावा, की आपण जेवढे आहोत त्यांनी आम्हाला जाणणारे जे आहेत त्यांच्यापर्यंत हा सत्याचा संदेश पोचवावा. ज्याप्रमाणे आपल्याला हे सदभाग्य लाभलं आहे, दातार कृपा करो, की प्रत्येक घरामध्ये हा ज्ञानाचा उजेड पसरावा आणि त्यांनाही हा प्रकाश लाभावा.

❖❖❖

# शब्दकोडे ९८५

○ पूजा अरोडा ( रेवाडी-हरियाणा )




## उभे शब्द

१. जगातील सर्वात मोठे महाकाव्य

२. झेंडावंदन करताना ....... गीत म्हटले जाते

३. रामायणातील राजा दशरथ हा नात्याने सीतामातेचा ..... होता

६. 'जागतिक अपंग दिन' दरवर्षी ...... डिसेंबर या दिवशी साजरा केला जातो.

७. वाढदिवसाला ही बत्ती हवीच

८. 'काका सारनाथला गेले' या वाक्यात एक व्यावसायिक आहे, शोधा

९. श्रीलंकेचा एक क्रिकेटपटू फक्त नाव ..... जयसूर्या

११. पाकिस्तानचे चलन

१२. आलिया भोगासी असावे ...... (म्हण)

१३. बिहारमधील प्राचीन बौध्द विद्यापीठ

१४. स्वामी विवेकानंदांचे आडनाव

## आडवे शब्द

१. सर्वाधिक साखर कारखाने कोणत्या राज्यात आहेत ?

४. एक प्रसिध्द गायिका : आशा ........

५. भारताचे दुसरे सर्वात उंच धरण : .......

७. ऋषि विश्वामित्रांची तपश्चर्या भंग करणारी अप्सरा

१०. जे ..... आहेत त्यांच्यासाठी युवा सत्संगाचे आयोजन होते.

१२. गौतम बुध्दांचे पहिले प्रवचन जिथे झाले ते स्थळ

१४. आर्य समाजाची स्थापना महर्षि ....... यांनी केली

१५. संत निरंकार मिशनच्या मानव एकता दिनानिमित्त ...... शिबिरांचे आयोजन केले जाते

उत्तरे इतरत्र



# सुंदर असावं गाव

स्वच्छ नि सुंदर
असावं माझं गाव
रोगराईला तिथे
नसावा कधी वाव

शौचालयाचा करु
सारे वापर
आदर्श गावाचा
पटकावू पुरस्कार

संस्कारीत सुशिक्षित
मुलं असावीत छान
करु सत्कार, देऊ
वडिलधाऱ्यांना मान

पिकती शेतं शिवार
अन्नाची ना टंचाई
स्वावलंबी सारे
स्वकष्टाची कमाई

सुखावीत बळीराजा
गोठे सजती गोधने
नांदेल निकोडे सारा
गाव आनंदाने

- श्री कृ.गो.निकोडे
गडचिरोली





# आजोबा

चित्रांकन
लेखन, रंग
अजय कालडा







गोलू घरात नाही हे कळताच बकरी चिंतातूर झाली. ती लगेच जंगलाच्या दिशेने निघाली. गोलू दाट जंगलात जाईल याची तिला भीती वाटत होती. कारण तिथे नेहमीच हिंस्त्र पशू शिकारीच्या शोधात असतात.
बकरी थोडी पुढे गेल्यानंतर तिला गोलू झाडांच्या मागे लपलेला दिसला. आपल्या आईला पाहताच गोलू आनंदाने उड्या मारु लागला.
आई आई तू मला शोधून काढलस.
गोलू तुला किती वेळा सांगितलं की या बाजूला कधी यायचं नाही म्हणून


गोलू, तुला समजत कसं नाही ? एके दिवशी तूही संकटात सापडशील आणि मला सुध्दा संकटात टाकशील.
पण खोडकर गोलूला चैन कुठे ? दुसऱ्या दिवशीच आईची नजर चुकवून तो पुन्हा दाट जंगलात गेला.
तो जंगलात जाताच त्याच्यावर कोल्ह्याची नजर पडली. एकट्या कोकराला पाहताच तो पटकन त्याच्या जवळ गेला.


अचानक कोल्ह्याला समोर आलेला पाहून गोलू घाबरला. तो मदतीसाठी ओरडू लागला. कोल्ह्यानेसुध्दा त्याच्यावर झडप घालायची पूर्ण तयारी केली होती.
कोल्हा झेप घेणार, इतक्यात बकरी आपल्या मित्रांना व शिकारी कुत्र्याला बरोबर घेऊन तिथे पोहचली.
शिकारी कुत्र्याने भुंकायला सुरुवात करताच कोल्हा घाबरला आणि पळत सुटला. गोलू मात्र वाचला.
तात्पर्य :- मुलांनो, आपल्या आई-वडिलांचं नेहमी ऐकलं पाहिजे. कारण तेच आपल्याला योग्य मार्गदर्शन करु शकतात.



कथा

# ९९ - चा फेरा

आटपाट नगर होते. तिथे एक राजा होता. सर्व ऐशोआराम, सुख पायाशी लोळत असूनही तो नेहमीच चिंतेत असायचा. त्याला समाधान असे कधीच वाटले नाही. एके दिवशी असाच विचार करत असतांना त्याचे लक्ष एका नोकराकडे गेले. काम करीत असतांना तो स्वत:शीच छानसं गाणं गुणगुणत होता. त्याचा सदोदित आनंदी चेहरा पाहून राजाला आश्चर्य वाटले. राजा विचार करु लागला, “मी एवढा सार्वभौम राजा असुनही समाधानी, आनंदी नाही आणि हा माझा नोकर मात्र एवढा प्रफुल्लित, आनंदी कसा ?”

राजाने नोकराला विचारले, “तू एवढा आनंदी कसा काय राहतोस ?”

नोकर उद्‌गारला “महाराज! मी आपला एक मामूली नोकर. माझ्या कुटुंबाच्या गरजा फारच थोड्या आहेत. मला फक्त डोक्यावर छप्पर आणि पोट भरण्यासाठी गरमागरम अन्न असलं म्हणजे

पुरे!”

राजा विचारात पडला. त्याने आपल्या अत्यंत विश्वासू प्रधानास ही गोष्ट सांगितली.

सर्व वृत्तांत ऐकल्यावर प्रधान म्हणाला, “हे राजन हा नोकर अद्याप ९९ च्या फेऱ्यात सापडला नाही म्हणून तो अत्यंत आनंदात आहे.”

राजाने विचारले,“९९ चा फेरा ही काय भानगड आहे?” प्रधान उत्तरला,“राजन!९९ चा फेरा म्हणजे काय पाहायचे असेल तर ९९सुवर्णमुद्रा एका थैलीत भरुन ती थैली ह्या नोकराच्या घराच्या दरवाजाच्या पायरीवर ठेवून द्या व गंमत पहा!”

राजाने तसा आदेश दिला. प्रधानाने ९९ सुवर्णमुद्रा भरलेली पिशवी नोकराच्या दारी ठेवून दिली. सकाळी नोकर सुवर्णमुद्रांनी भरलेली पिशवी आपल्या दारात पाहून अतिशय आनंदित झाला. तो जोराने ओरडला,“एवढ्या सुवर्णमुद्रा”असे म्हणून तो सुवर्णमुद्रा मोजू लागला. बऱ्याच वेळा मोजूनही त्या बरोबर ९९ च भरल्या. त्याला खूप आश्चर्य वाटले. तो मनांतल्या मनात म्हणाला, ती शेवटची मुद्रा काय झाली असेल? नक्कीच ९९ सुवर्णमुद्रा कुणीही अशा सोडणार नाही.

त्याने सर्वदूर शोधले पण ती एक सुवर्णमुद्रा त्याला सापडली नाही. शेवटी त्याने असा विचार केला, असू दे मी खूप कष्ट करेन व ती १०० वी मुद्रा मिळवेनच!

त्या दिवसापासून त्या नोकराच्या वागणूकीत अमुलाग्र बदल झाला. तो अधिक वेळ काम करू लागाला. चिडचिड करु लागला. आपल्या कुटुंबाला दोष देऊ लागला की, ते शंभरावी मुद्रा कमवण्यासाठी काहीच मदत करीत नाहीत.

अशा प्रकारे त्याचं गाणं गुणगुणनं सुध्दा बंद झालं.

नोकरामधील हा नाट्यमय बदल पाहून राजा बुचकळ्यात पडला. तेव्हा प्रधान म्हणाला, “हे राजन! हा नोकर आता विधीवत ९९ च्या फेऱ्यात सापडला आहे.”

९९ चा फेरा हे नाव अशा लोकांना दिले जाते. ज्यांच्याकडे आनंदी जीवन जगण्यापुरते धन तर असते पण त्यांची हाव अधिकचा १ आणखी कमावण्यासाठी ते जीवाचे रान करतात! आणखी हवे... आणखी हवे.. या हव्यासापोटी जीवनातील आनंद मात्र घालवतात.

आपल्या आयुष्यात गरजेपोटी धन मिळते तेव्हा आपण सुखी समाधानी असतो. मात्र ज्याक्षणी थोडेसे जास्त मिळते त्या क्षणापासून अजून जास्त...अजून जास्त...मिळण्यासाठी आपण त्यामागे धावतो.

आपल्या वाढत्या गरजा भागवण्यासाठी, सुखवस्तू जीवनाच्या इच्छापूर्तीसाठी जास्त काम करावे लागते. आपली झोप उडते. आनंद नष्ट होतो असं हे दुष्टचक्र सुरु होते.

तेव्हा असा हा ९९ चा फेरा!

यासाठी काहीही करावं लागत नाही; परंतु जीवनभर त्याच्या मागे धावताना जी किंमत मोजावी लागते ती जीवनातील सर्व आनंद नष्ट करते.

म्हणून वेळीच सावधान व्हावे!!!

आनंदी राहण्यासाठी आहे त्यात समाधान मानून आपले जीवन सुखकर बनवावे.

- सचिन साळुंखे, दादर - मुंबई

# आरोग्यदायी कोबी



स्वयंपाकघरातून आपल्या जेवणाच्या ताटामध्ये हक्काने येणारी कोबीची भाजी शिजतेच. भारतामध्ये कोबी बारमाही मिळते. कोबीचे रोप दीड-दोन फूट वाढते. पानावर पाने चढून त्यातून कोबीचा गड्डा तयार होतो. आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत फायदेशीर असा हा कोबी ओली व सुकी भाजी, कोशिंबीर, कोबीवडे आदी अनेक माध्यमातून आपल्या जिभेची चव वाढवतो. कोबी मधूर, पचण्यास जड, पित्त व कफनाशक, थंड आहे.

-: कोबीचे फायदे :-

- कच्च्या कोबीची कोशिंबीर बनवून खाल्ल्याने 'सी' जीवनसत्त्व प्राप्त होते.
- मधुमेही व्यक्तींनी शिळा कोबी चिरुन खावा.
- कोबी चिरुन वाफवून घ्यावा. त्यात जिरेपूड, बारिक केलेली कोथिंबीर, गाजराचा कीस घालावा. तापामधून उठलेल्या व्यक्तींची पचनशक्ती मंदावलेली असते. अशांनी वरील प्रकारे कोबीची कोशिंबीर बनवून खावी.
- तहान लागणे, अतिसाराचा त्रास होणे यावर कोबीचा रस व मध यांचे मिश्रण घ्यावे.
- कावीळ झाल्यास आहारामध्ये वाफवलेला कोबी खावा.
- लघवीचा विकार असणाऱ्यांनी कोबीचा रस धनेपूड घालून दिवसातून तीन वेळा घ्यावा.
- आम्लपित्ताचा विकार असणाऱ्यांनी कोबीच्या रसामध्ये गाईचे तूप व साखर घालून रोज सकाळी घ्यावा. त्यामुळे मस्तकदाह, उदरदाह, मूत्रमार्गाचा तसेच गुदाशय मार्गाजवळ दाह होणे सुध्दा कमी होते.
- कोबीचा रस चमचाभर रोज सकाळी घ्यावा. मधुमेह, कावीळ, हिरड्यांमधून रक्त वाहणे, हृदयाची धडधड, रक्ती मूळव्याध, मूत्रविकार, पोटांचे विकार, त्वचा कोरडी पडणे आदी विकारांवर याचा फायदा होतो.
- हृदयाचा दाह, मस्तकशूळ, उदरदाह यांमधे कोबीचा रस साखर घालून घ्यावा.
- त्वचारोग असणाऱ्यांनी उदाहरणार्थ गाठ येणे, फोड, पुटकुळ्या, मुरुमे येणे यांवर कोबीचे भरीत करुन खावे.
- खोकल्याची ढास लागणे, उबळ येणे यांवर पानकोबीचा रस घ्यावा. यासाठी कोबीचा रस काढून तीन तारी साखरेच्या पाकात घालून त्याचे सरबत करुन ठेवावे. कफ, खोकला आदींचा त्रास होऊ लागल्यास या सरबताचे सेवन करावे.
- कोबीची भाजी वरचेवर आपल्या आहारात ठेवल्यास पोटात वायू धरणे, वरचेवर शौचाला लागणे बंद होते.
- गुडघ्याला सूज येऊन ठणका लागल्यास त्यावर कोबीची पाने बांधावीत.


-: दक्षता :-

- कोबी वातूळ असल्याने गरम मसाला व तेलाची फोडणी देऊन भाजी बनवावी. कोबीच्या अतिरेकी सेवनामुळे काही जणांना मूत्रावरोधही होतो.

❖❖❖

## पोटासाठी उत्तम

# पादांगुष्ठनासास्पर्शासन





पोट स्वस्थ तर सारं काही उत्तम असं म्हणतात. त्यामुळे पोटाचे स्नायू मजबूत करणाऱ्या पादांगुष्ठनासास्पर्शासन या आसनाविषयी आज जाणून घेऊ. या आसनामुळे कंबर, पाठ आणि मानेचे स्नायू लवचिक होतात. पायांमध्येही लवचिकता येते. शरीराला हलकेपणा येतो. त्याबरोबरच पचनशक्ती सक्रीय होण्यास मदत होते. या आसनाचा आणखी एक फायदा म्हणजे पुढे आलेली नाभी जागेवर आणण्यास हे आसन उपयुक्त ठरतं. किडनी, यकृत, आतडी, स्वादुपिंड, मलाशय, मुत्राशय हे सगळे अवयव चांगल्या प्रकारे काम करु लागतात. हे आसन करत राहिल्यानं बध्दकोष्ठता, गॅस, भूक न लागणं आणि लठ्ठपणा यामध्ये लाभ होतो.

### काय काळजी घ्याल ?

हे आसन करताना खूप काळजी घ्यायला हवी. आसन करताना आणि आसनातून परत पूर्वस्थितीत येताना कोणत्याही प्रकारची जोरजबरदस्ती करु नये. ऑस्टिओपोरोसिस, कंबरेचे दुखणं, स्लिप डिस्क किंवा सायिटिकाचं दुखणं सतावत असेल तर हे आसन करु नये.

### कसं कराल ?

उताणं झोपा आणि शरीर सैल सोडा. आता डावा पाय हळूहळू वर उचला. गुडघा बाहेरच्या बाजूला ठेवून दोन्ही हातांनी पायाचे तळवे पकडा. हातांच्या मदतीनं पाय चेहऱ्याच्या दिशेनं आणा. त्यानंतर डोकं वर उचला आणि पायाचे अंगठे नाकाला लावण्याचा प्रयत्न करा. पायाचा अंगठा नाकाला लागल्यानंतर श्वासोच्छ्वासाची गती सामान्य ठेवून, जेवढा वेळ शक्य आहे तेवढा वेळ या आसनात थांबा. इथे दुसरा पाय जमिनीवर सरळ राहील. पोटावर सतत दबाव येईल. यानंतर हळूहळू पाय पुन्हा पूर्वस्थितीत आणा. अशा प्रकारे दुसऱ्या पायानेही करा. वेगवेगळ्या दोन्ही पायांनी तीन-तीन वेळा करुन झाल्यानंतर दोन्ही पायांनी एकत्र करुन पाहा.

❖❖❖



कथा

# साधुबोध

विलासपूर नगरीत एक सावकार राहात होता. त्याच्या घरात सर्व सुखसोई होत्या. धन संपत्ती होती. परंतु घरात सदैव अशांती आणि बेचैनी असे. आपल्याला शांती समाधान कसे लाभेल या विचारात तो बसला असताना एका साधू महाराजांना जाताना त्याने पाहिले. त्यांना आपल्या घरी बोलावून त्यांचे आदरातिथ्य केले आणि आपले दु:ख त्यांच्यासमोर मांडले.

साधु महात्मा अंतर्ज्ञानी होते. त्यांनी थोडा वेळ डोळे मिटले आणि सांगितले,"आज मी इथं रात्रभर मुक्काम करणार आहे. माझी व्यवस्था घरात न करता अंगणात किंवा ओट्यावर करा."

रात्रीचे भोजन आटोपल्यावर महात्मा विश्रांतीसाठी खाटेवर आडवे झाले. थोड्या वेळाने त्यांना कोणाचा तरी कुजबुजण्याचा आवाज आला. ते तो आवाज लक्षपूर्वक ऐकू लागले. सावकाराच्या हवेली शेजारी घोडे, बैल, गाढवं बांधलेली होती. ती आपापसात बोलत होती. आपापलं दु:ख एकमेकांना सांगत होती. महात्मा प्राण्यांची मूकभाषा जाणत होते.

बैल आपल्या संवगड्यांना सांगत होता, "गड्यांनो, आपण दिवसभर ऊन्हातान्हात राबतो. कधी थकवा आला तर थांबलो की लगेच पाठीवर काठीचे फटके पडतात." दुसरा बैल म्हणाला, "परवा माझा पाय खड्ड्यात पडून मुरगळला पण मालकाने सटासट रट्टे मारत बैलगाडीला जुंपलं. आपलं दु:ख यांना काय कळणार."

घोड्यानेही आपली कर्मकहाणी सांगायला सुरवात केली. ते ऐकून एक तरुण गाढव त्याच्या आईला म्हणालं, “आई, आपण एवढी ओझी उचलतो पण आपलं मात्र कौतुक होत नाही. ती आळशी मांजर सदान्कदा पडून राहते, तिला मात्र दूध वेळच्या वेळी दिलं जातं. शिवाय घरात कोठेही फिरा, मालकाच्या बिछान्यावर झोपा, सगळी सूट आणि मी मात्र आनंदाने गाणं म्हणायला लागलो तर मला सोट्याचा मार देत मालक म्हणाले, मूर्खा कशाला ओरडतोस, चल कामाला लाग. असं म्हणून माझ्या पाठीवर मोठे गठ्ठे लादून मला बाजारात पाठवलं. कालपासून माझी पाठ दुखते आहे पण मालकाला मात्र काहीच कदर नाही.” आपल्या लेकराचं दु:ख ऐकून त्याची आई म्हणाली,“बाळ आपण पशू म्हणून जन्माला आलो आहोत आपल्याला हे भोग भोगलेच पाहिजेत; पण देवाला एवढीच प्रार्थना करुया, की या माणसांना माणुसकीने वागण्याची बुध्दी दे, त्यांच्या मनात आमच्या सारख्या प्राण्यांविषयी दयाभाव जागृत होऊ दे.”

सर्व प्राण्यांची कैफियत ऐकून साधू महात्मा खूप दु:खी झाले. सकाळी उठल्यावर सावकाराला त्याने सारा प्रकार सांगितला आणि समजावले, की आपल्यामुळे एखादा जर जीव दुखावला गेला असेल तर आपण कधीच सुखी होऊ शकत नाही म्हणून कोणाला त्रास देणे, कोणाचे मन दुखवणे अशा गोष्टी कटाक्षाने टाळाव्यात. प्रत्येक जीवात ईश्वर आत्मारुपाने वास करत असतो. याचाच अर्थ कोणाला दु:ख देणे म्हणजे ईश्वराला दु:ख देण्यासारखं आहे.

साधु महात्म्यांचे आभार मानत सावकाराने सर्व प्राण्यांना खूप जीव लावला, त्यांची चांगली काळजी घेतली. तेव्हापासून सावकाराच्या जीवनात आनंद निर्माण झाला. साधु संतांनीही म्हटलय-

कुणाही जीवाचा न घडो मत्सर
हेचि वर्म सर्वेश्वर पूजनाचे ।।


सर्व प्राणिमात्रांवर प्रेम हीच खरी ईश्वर पूजा आहे.

❖❖❖



# वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा



| | | | | |
|---|---|---|---|---|
|  |  |  |  |  |
| आरुष सोनीस | अदिती साईल | अक्षता आर्दद | अथांग भूतल | अवनित भोर |
|  |  |  |  |  |
| भक्ती मंढाना | गार्गी पाटील | कश्वी सावंत | कनिका सुर्वे | विहंगा मुकुंद |
|  |  |  |  |  |
| अन्वी शिंगाडे | अमनदीप चमन | अवनि आग्रे | रुचिरा भागवत | सहेजता जाधव |



# वैज्ञानिक प्रश्नोत्तरे



प्रश्न : चपातीची एक बाजू जाड व एक बाजू पातळ का असते ?

उत्तर : चपातीच्या कणकेत ग्लूटेन नावाचे प्रोटीन असते. जेव्हा चपातीची एक बाजू गरम होते. त्यावेळी हे प्रोटीन एक पातळ थर बनवते. हा थर हवेला बाहेर जाण्यापासून रोखतो. जेव्हा चपती दुसऱ्या बाजूने शेकली जाते तेव्हा पाण्याची वाफ झाल्याने जो वायू तयार होतो त्याला बाहेर पडण्यास ग्लूटेन रोखून ठेवते. वायू एकत्र झाल्यामुळे हा थर चपातीच्या इतर भागापेक्षा वेगळा होतो व चपाती फुगते.

प्रश्न : चहा कपापेक्षा बशीमध्ये लवकर का थंड होतो ?

उत्तर : सारख्याच तापमानाचा चहा कपात व बशीत ओतला तर बशीतील चहा लवकर थंड होतो. कारण कपाचे वरचे क्षेत्रफळ कमी असते व बशीचे क्षेत्रफळ जास्त असते. मोठ्या क्षेत्रफळावर बाष्पीभवनाचा वेग जास्त असतो. बशीतील चहाचे बाष्पीभवन लवकर होते व त्याला लागणारी उष्णता चहातून घेतली जाते. त्यामुळे चहाचे तापमान लवकर कमी होऊन तो लवकर थंड होतो.

प्रश्न : गरम चहा पिण्यासाठी चिनीमातीचा कप का वापरतात ?

उत्तर : काच, चिनीमाती हे उष्णतेचे दुर्वाहक आहेत. त्यामधून उष्णता लवकर वाहत नाही. चिनीमातीच्या कपात उकळता चहा ओतला तरी पण कप बाहेरून जास्त गरम होत नाही. त्यामुळे कप हातात धरणे सुलभ होते. कपाचे काठ लवकर गरम होत नसल्याने चहा पिताना ओठ भाजत नाहीत. म्हणून गरम चहा पिण्यासाठी चिनीमातीचा कप वापरतात.

प्रश्न : झाडाच्या बुंध्याला प्रत्येक वर्षी नवीन चक्र कसे तयार होते ?

उत्तर : जेव्हा झाडांची वाढ होत असते तेव्हा ती त्या देठाभोवती लाकडी तंतूंचे आवरण निर्माण करत असते. या तंतूंना छोटी छोटी छिद्रं असतात. ज्याच्यामुळे वसंत ऋतुमध्ये त्यांच्यामार्फत जास्तीत जास्त पाणी पानांना पोहचवता यावे. शरद ऋतुमध्ये हेच तंतूंचे आवरण रंगाने भडक आणि जाड (घट्ट) होते. ज्यामुळे झाडाला बळकटी यावी आणि थंडीमधील झाडातील पाणी आर्द्रतेने बाष्पीभवन होऊ नये. हीच ती क्रिया आहे ज्यामुळे झाडाच्या देठाभोवती वर्तुळे निर्माण होतात. ही वर्तुळे जर मोजलीत तर वर्तुळांची जी संख्या असेल तितके झाडांचे वय असते.




# कळसूबाई

तालुका :- अकोले
जिल्हा :- अहमदनगर
चढाईचे मार्ग :- १. पूर्वेकडील बारी गावातून
२. दक्षिणेकडील उडदावणे गावातून
३. उत्तर बाजूने इंदोरे गावाकडून
योग्य वेळ :- खरं तर या शिखरावर जाणाऱ्यांची बारमाही वर्दळ असते. तरी सर्वोत्तम वेळ ऑक्टोबर ते डिसेंबर
गाडी मार्ग :- नाशिक-घोटी-पिंपळगाव मोर-बारी गाव

कळसूबाई हे महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखर आहे. कळसूबाई शिखराची उंची समुद्र सपाटीपासून १६४६ मीटर आहे, तर पायथ्याच्या बारी गावातून याची उंची अंदाजे ९०० मीटर आहे. भंडारदरा धरण येथून ६ कि.मी वर आहे. तेथे २ दिवस मुक्काम करून कळसूबाई , रंधा धबधबा, कोकणकडा इत्यादी ठिकाणे पाहाता येतात.

कळसूबाई हे महाराष्ट्रातील सर्वांत उंच पर्वतशिखर आहे.समुद्रसपाटीपासून त्याची उंची ५४०० फूट म्हणजे सुमारे १६४६ मीटर आहे. नाशिक-इगतपुरी महामार्गावरील घोटी या गावापासून घोटी-भंडारदरा रस्त्याने गेल्यास बारी हे गाव लागते. बारी हे गाव महादेव कोळी या आदिवासी जमातीचे आहे. या गावापासून कळसूबाई शिखरावर जाण्याचा मार्ग आहे. शिखरावर कळसुबाई देवीचे एक छोटे मंदिर आहे. देवीची अशी आख्यायिका सांगितली जाते की, कळसुबाई ही तेथील गावातील सून होती. तिला बऱ्यापैकी औषधी वनस्पतींबद्दल ज्ञान होते. त्याने ती गावातील लोकांची सेवा करत असे. कालांतराने तिच्या मृत्यू नंतर गावातील लोकांनी तिची ओळख




म्हणून त्या शिखराला तिचे नाव दिले आणि तिची आठवण म्हणून शिखरावर एक छोटे मंदिर बांधले. आदिवासी समाजामध्ये पूर्वजांना देव मानले जाते म्हणून आजही कळसुबाईला ते आपली देवी मानतात. कळसुबाई ही आदिवासींची कुलदेवी आहे. संगमनेर गावापासूनही भंडारदरामार्गे बारी गावास जाता येते. ट्रेकिंगचा छंद असेल तर भेट द्यायला हे एक उत्तम ठिकाण आहे.

कळसूबाईचा डोंगर चढायला सुरुवात केल्यावर पहिल्या टप्प्यावर कळसूबाईचे नवीन मंदिर लागते. ज्या लोकांना शिखरावर जाणे शक्य नाही, त्यांच्या सोईसाठी हे मंदिर बांधलेले आहे. पुढे दुसरी शिडी पार केल्यावर कातळात दोन पावले कोरलेली आहेत, ती कळसूबाईची पावले आहेत अशी श्रध्दा आहे. शेवटच्या शिडीच्या खाली विहीर व बाजूला एक पत्र्याची शेड आहे. शिखरावर कळसूबाईचे छोटे मंदिर आहे. देवळात साधारण ३ माणसे बसू शकतील एवढीच जागा आहे. येथून समोरच खाली भंडारदऱ्याचा अथांग पसरलेला जलाशय लक्ष वेधून घेतो. या शिखरावरून उत्तरेला रामसेज, अचला, अहिवंत, सप्तश्रृंग, मार्कंडा, धोडप, रवळ्या जवळ्या, कोळधेर अशी डोंगररांगा नजरेस पडतात. पूर्वेकडे औंढा, विश्रामगड, अलंग, मदन, कुलंग, माथेरान, हरिश्चंद्रगड लक्ष वेधून घेतात.

या शिखरावर जाण्यासाठी मुख्य वाट ही बारी गावातून जाते. भंडारदऱ्यापासून 'बारी' हे गाव अवघ्या ६ कि.मी अंतरावर आहे. बारी गावात जायचे झाल्यास मुंबई-नाशिक मार्गावर इगतपुरी गाठावे. इगतपुरीवरून भंडारदऱ्याला जाणाऱ्या एसटी ने बारी या गावी यावे. येथून शिखरावर जाण्यास ३ तास लागतात. वाटेत तीन ठिकाणी आता लोखंडी शिडया बसविलेल्या आहेत. गावातच सामान ठेवून ५ ते ६ तासात शिखरावर जाऊन येता येते. गावातून बाहेर पडल्यावर एक ओढा लागतो. हा ओढा ओलांडून झाल्यावर थोडयाच अंतरावर एक मंदिर लागते. या मंदिराच्या मागच्या बाजूने जाणारी वाट थेट शिखर माथ्यापर्यंत घेऊन जाते.

स्वत:चे वाहन असल्यास मुंबई - कसारा



मार्गे घोटी गाठावे. घोटी - सिन्नर मार्गावर भंडारदरा फाटा आहे.या फाट्यावरुन भंडारदऱ्याला जातांना, भंडारदऱ्याच्या अलिकडे ६ कि.मी अंतरावर 'बारी' हे गाव आहे.

**राहण्याची सोय** :- येथे शिखरावर रहाण्याची सोय नाही. शिखराखालील शेडमध्ये किंवा भंडारदऱ्याला किंवा बारी गावात राहण्याची सोय होऊ शकते.

जेवणाची सोय :- बारी गावात/ भंडारदऱ्याला जेवणाची सोय होते. तसेच सध्या शिखरावर असणाऱ्या विहिरीलगत चहा आणि भजी उपलब्ध आहे.

**पाण्याची सोय** :- शिखरावर जाताना शेवटच्या टप्प्यावर शिडीच्या अगोदर एक विहीर आहे. वाटेत पाणी मिळत नसल्याने बारी गावातच पाणी भरून घ्यावे.

**शिखरावर जाण्यासाठी लागणारा वेळ** :- बारी गावातून ३ ते ४ तास लागतात.


हा नाइट ट्रेक करावयाचा असेल तर पौर्णिमेचा दिवस, तीन दिवस अलीकडे किंवा पलीकडे असा दिवस निवडावा. उडदावणे या पायथ्याच्या गावी शक्यतो सायंकाळपर्यंत पोहोचावे. आठ वाजेपर्यंत जेवण करुन तासभर आराम करुन ट्रेक सुरु करावा. या गावात शासनाने काही व्यक्तींची वाटाडे म्हणून नेमणूक केली आहे. साधारण चाल ठेवली तर कळसू शिखराच्या खालील टप्प्यावरील विहिरीपर्यंतच्या थांब्यावर पोहचायला ५ तास पुरेसे ठरतात. भल्या पहाटेला उरलेली चढाई करावी. माथा गाठून कळसूदर्शन व सूर्योदय अनुभवून उन माथ्यावर यायच्या आत परतीला निघून पायथा गाठावा. प्रत्येकी ३ लिटर पाणी, हॅट, बॅटरी व खाण्याच्या वस्तू घरुनच सोबत घेऊन जाव्यात.

❖❖❖

## दिव्य वाणी

मनुष्य वर्तमानात असा वागत आहे की, अमृतपान न करता विष प्राशन करत आहे. प्रेम न करता वैर-विरोधालाच जीवनात प्राधान्य देत आहे. संतजन-भक्तजन त्याला जीवन जगण्याची वास्तविक दिशा प्रदान करत आहेत, वैर-विरोधाचा त्याग करुन त्याला प्रेम करायला शिकवत आहेत. धर्माच्या नावावर माणूस माणसाचे रक्त सांडायला तयार आहे. भक्त-महापुरुष त्याला परमात्म्याशी नातं जोडण्याची प्रेरणा देतात, जेणेकरुन त्याने जाणावं, मानावं की सर्वांमध्ये एकच तत्त्व सामावलेले आहे. तर मग कोणाचा द्वेष का करावा? सर्वांसाठी प्रेम, नम्रता, सहनशीलतेने का वागू नये?

– युगद्रष्टा बाबा हरदेवसिंहजी महाराज






आई : बंड्या, आंघोळीला चालला आहेस ना! मग बाथरुममध्ये मोबाईल कशाला घेऊन जातो आहेस ?
बंड्या : मग बादली भरे पर्यंत काय करू?

❖❖❖❖❖

चिंट्या : बाबा, एक ग्लास पाणी द्या ना!
बाबा : स्वत: उठून घे!
चिंट्या : द्या ना बाबा प्लीज!
बाबा : चिंट्या, थोबाडीत देईन हं तुझ्या
चिंट्या : बरं.....थोबाडीत द्यायला याल तेव्हा घेऊन या.

❖❖❖❖❖

बाबा : काय रे बन्या, आज लवकर झोपलास? अभ्यास नाही का तुला?
बन्या : आई म्हणाली, कोणाला त्रास होणार नाही असं काम कर, म्हणून मग मी निवांत झोपलो.

❖❖❖❖❖

पाहुणे : काय गणेश बारावी पास झाल्यावर पुढे काय?
गणेश : बहुतेक रेल्वे स्टेशनवरच जाणार आहे, सध्या तिथेच करियरला स्कोप मिळेल असं वाटतं.
पाहुणे : ते कसं काय ?
गणेश : आपले मोदी साहेब स्टेशनवर चहा विकून प्रधानमंत्री झाले. रानू मंडल स्टेशनवर गाणी गाऊन स्टार गायिका बनली ना...

❖❖❖❖❖

दिग्या : पक्या तू नेहमी शाळेत टोपी घालून का येतोस रे?
पक्या : अरे, माझ्या डोक्यात काय चाललय ते कोणाला कळू नये म्हणून!

❖❖❖❖❖

पिंकी : आई, तू पण लोकांची धुणी-भांडी करायला जा ना!
आई : पिंकी, अगं काय बोलतेस तू हे?
पिंकी : अगं आई, आमच्या मॅडम सांगत होत्या, कामवाल्या बाईच्या मुलीला ९९% मार्क मिळाले.

❖❖❖❖❖

न्यायाधीश : (पुण्याच्या जोशींना ) तुम्ही पोलिसाच्या खिश्यात जळती काडी का टाकली?
जोशी : साहेब, माझ्या वकिलानेच सांगितले, जामीन हवा असेल तर पोलिसाचा खिसा गरम करावा लागेल.

❖❖❖❖❖




पाहुणे : काय छोटू, शाळेला सुट्या लागल्या?
छोटू : हो!
पाहुणे : मग पुढे काय करायचं ठरवलं आहेस?
छोटू : काय नाय ! तुम्ही गेलात की तुमच्या प्लेटमधला सगळा खाऊ संपवणार.

❖❖❖❖❖

कंपनीचा मालक : आपल्या कंपनीत तयार होणाऱ्या गाड्यांचा ॲव्हरेज प्रतिलीटर पंधरा कि.मी. आहे. तो आपल्याला प्रतिलीटर तीस पर्यंत न्यायचा असेल तर काय करावं लागेल?
इंजिनिअर : रोडवरचे किलोमीटरचे दगड जवळ-जवळ आणून लावायचे.

❖❖❖❖❖

महादू : केळी कशी दिली?
केळीवाला : २० रुपयाला १२
महादू : काही कमी कर की!
केळीवाला : ठीक आहे, वीस रुपयाला १० घे.

❖❖❖❖❖

फाशीपूर्वी गुन्हेगाराला विचारण्यात आले की, "तुला आता फाशी देण्यात येणार आहे. त्यापूर्वी तुझी काही शेवटची इच्छा असेल तर सांग!"
"साहेब, माझी एवढीच इच्छा आहे की, मला खाली डोकं व पाय अशा अवस्थेत फाशी दिली जावी!" गुन्हेगार म्हणाला!

❖❖❖❖❖

एक माकड : काय रे तू या झाडावर कशासाठी चढला आहेस?
दुसरे माकड : पेरू खायला.
पहिले माकड : अरे, पण हे वडाचं झाड आहे.
दुसरे माकड : म्हणून काय झालं? पेरू आणलाय ना मी!

❖❖❖❖❖

शर्माजी : वर्माजी, तुम्हाला गरम होतं तेव्हा तुम्ही काय करता?
वर्माजी : ए.सी. जवळ जाऊन बसतो.
शर्माजी : तरी पुन्हा गरम होत असेल तर?
वर्माजी : तर ए.सी. ऑन करतो.

❖❖❖❖❖

सेल्सगर्ल : मॅडम तुम्ही कोणता साबण वापरता?
बनी : श्रावणीचा साबण, श्रावणीचा ब्रश, श्रावणीची पावडर....
सेल्सगर्ल : श्रावणी ही कोणती कंपनी आहे? इंटरनॅशनल कंपनी आहे का?
बनी : नाही, श्रावणी ही माझी रुम पार्टनर आहे.....!

❖❖❖❖❖



समर्थ दर्शन : भाग - ६२

# वासुदेव गोसावी

सदाशीव शास्त्रींशी चर्चा करायला समर्थांनी एका अंत्यजाला बोलावले. आज्ञा होताच अंत्यजाने उत्तर दिले,"आजपर्यंत मठातील अन्न खाल्ले आहे. त्याचे फळ आज मिळत आहे." असे म्हणून त्यांनी त्या शास्त्रीबुवांना पूर्वप्रश्न करण्यास सांगितले. हा अद्‌भुत चमत्कार पाहून शास्त्रीबुवा तर बहुतेक विरघळलेच होते. तथापि त्यांनी पूर्वप्रश्न केला. त्या अंत्यजाने श्रुतिस्मृतीच्या आधारे त्याचे खंडन करुन टाकले.

कोणत्याही प्रकारे उपाय राहिला नाही. आपण सर्वतोपरी हरलो असे पाहून सदाशीवशास्त्री यांनी समर्थांपुढे लोटांगण घातले. स्वहस्ते मशाल विझवली व जानव्यातील सुरीने स्वत:ची जीभ कापून घेऊ लागले. हे पाहून समर्थ म्हणाले, "कल्याणा पाहतोस काय? ब्राह्मण मरतोय धर, धर." कल्याणस्वामींनी जाऊन शास्त्रीबुवांच्या हातातील सुरी काढून घेतली.

अंत्यजाने शास्त्रीबुवांना विनंती केली,"एवढा वेळ आपण पूर्वप्रश्न केला व मी उत्तरपक्ष केला. आता मी पूर्वप्रश्न करतो, आपण उत्तरपक्ष करावा."

ते ऐकून शास्त्रीबुवांनी विचार केला,'इथे

विद्धवत्तेचे काम नाही. एवढा वेळपर्यंत झाले तेच पुढे होणार' असे जाणून शास्त्रीबुवांनी माघार घेतली व "मी शरण आलो आहे,आजपर्यंत मी अनेक ब्राह्मणांना छळले, याकरिता माझा उध्दार करावा." म्हणून समर्थांना विनंती केली.

तेव्हा समर्थ म्हणाले, "जिव्हा कुणाची आणि कुणी कापावी ?दिवटी कुणाची आणि कुणी विझवावी ? रघुपतींच्या भांडारात अनेक विभूती आहेत. याकरिता असा दुराग्रह कुणी करु नये." हे मधूर भाषण ऐकून शास्त्रीबुवांच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहू लागल्या. जवळ महाराजांसह पुष्कळ मंडळी होती त्यांनाही आश्चर्य वाटले.

ह्याप्रमाणे शास्त्रीबुवांच्या वादाची गोष्ट संपल्यानंतर समर्थ त्या अंत्यजाला म्हणाले, "बाबा तुझं काम झालं. तू उत्तम सेवा बजावलीस. आता मोळी घे आणि आपल्या कामाला लाग."

अंत्यजाने हात जोडून म्हटले, "महाराज आपण जग उद्धारकर्ते! आपण आपल्या कृपाप्रसादाने मला विद्वान ब्राह्मण बनविले आणि आता पुन्हा अंत्यज करणार काय? हे कसं शोभेल? हे आपल्या कीर्तीला भूषणावह होईल काय?"

समर्थ हसले आणि म्हणाले, "एकूण तुम्ही आम्हांला पकडीत धरले. काय बरं आता तुझं म्हणणं आहे?"

तेव्हा त्या अंत्यजाला पूर्वजन्मीचे सारे स्मरण होऊन तो बोलू लागला, "मी पूर्वी चित्रसेन गंधर्व असून स्त्रीसह क्रीडा करीत असताना, नारदाचा अपमान केला, म्हणून त्यांनी मला शाप दिला. त्याप्रमाणे मी पहिल्या जन्मी जयत्पाल राजांच्या इथे घोडा झालो. तेथे मुकुंदराजांचा अवतार घेऊन शंकरांनी माझी मुक्तता केली. नंतर दुसऱ्या जन्मात पैठणला रेडा झालो. तेव्हा श्रीविष्णूंनी ज्ञानेश्वरांचा अवतार घेऊन माझ्या मुखाने वेद बोलवून माझी मुक्तता केली. सध्या चंपाकुलामध्ये अंत्यज झालो आहे. तेथे नारदांच्या उःशापाप्रमाणे रामदासांकडून माझी मुक्तता होणार होती. त्या भविष्याप्रमाणे सर्व झाले. आता मी मुक्ती घेणार."

हे ऐकून समर्थ म्हणाले, "ठीक आहे. आणखी तुला काय मागायचे आहे ते माग."

तेव्हा माझ्या जातीचा मानाचा नारळ श्रीचरणी असावा, असे त्याने मागितल्यावरुन समर्थांनी चाफळच्या रघुपतींची स्वारी रथारुढ होऊन निघाली म्हणजे, अंत्यजाला एक नारळ देण्याविषयी आज्ञा केली. ती प्रथा आताही चालू आहे.

नंतर त्या अंत्यजाने सर्वांदेखत तेथे देह ठेवला. तेव्हा समर्थ त्या धोंड्यावरुन उठले व त्याच्याखाली त्याचा देह ठेऊन वर तो धोंडा ठेवला. त्या अंत्यजाचे नाव बहिऱ्या असे होते. यावरून त्या धोंड्यालाही अद्याप बहिधोंडा असे म्हणतात.

त्या दिवसापासून सदाशिवशास्त्री यांनी सर्वसंगपरित्याग केला व सर्व ऐश्वर्य येवल्याला पाठवून देऊन समर्थांच्याच सेवेत राहिले. सर्वांभूती वासुदेव आहे, हे ध्यानात राहावे म्हणून शास्त्रीबुवांचे नाव समर्थांनी 'वासुदेव गोसावी' असे ठेवले व त्यांची कण्हेरीच्या मठावर स्थापना केली.

नंतर शिवाजी महाराज समर्थांसह चाफळच्या मठात गेले व तेथून मग साताऱ्याला गेले.

क्रमशः ...



# निरोप या वर्षाला

हे एकोणीस प्रिय वर्षा
थोडकेच क्षण राहिले
हितगुज करु जाता जाता ।।धृ.।।

सालाबादप्रमाणे
आखतो आम्ही योजना
होतात काहीशा पूर्ण
काहीत अधुरेपणा
शोधुया काय कारणे
ते गणित का चुकले ।।१।।

उत्साह तोच ठेवूनी
चालत राहू पुढे
गिरवत न्हायचे नाही
विसरुन जायचे धडे
अधिकाधीक जे
यत्न पाहिजे केले ।।२।।

हे मावळत्या वर्षा
तू सुंदर साथ दिली
क्षणा क्षणाने मजला
जगण्याची भाक दिली
तव तीव्र गतीसमवेत
मज नाही चालता आले.

- सुरेश तिर्लोटकर



# शांताबाई शेळके

शांताबाई शेळके हे एक बहुआयामी व्यक्तिमत्व. विविध रुपात शांताबाई आपल्याला पाहायला मिळतात तेव्हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील मोठेपणा समोर येतो. १२ ऑक्टोबर १९२२ साली पुणे जिल्ह्यात देवांग कोष्टी या विणकर समाजाच्या कुटुंबात शांताबाईंचा जन्म झाला. पुण्याजवळील राजगुरुनगर व मंचर ही दोन्ही शांताबाईंची आजोळं. त्यामुळे शांताबाईंचे बालपण तेथेच गेलं. बालवयातच ग्रामीण आणि नागरी दोन्ही संस्कार होत गेल्यामुळे त्यांच्या लेखनात ग्रामीण आणि नागरी साहित्याचा मिळता-जुळता सूर आपल्याला दिसून येतो. त्यांच्या घरातील सगळ्यांना वाचनाचा नाद असल्यामुळे हाती पडलेलं प्रत्येक पुस्तक शांताबाई वाचायच्या. अशा या पुस्तकांतील संस्काराचे प्रतिबिंब त्यांच्या मनावर उमटत गेले. पुणे विद्यापीठातून संस्कृत विषय घेऊन एम.ए ची परीक्षा सुवर्णपदकाच्या सन्मानासह शांताबाई उत्तीर्ण झाल्या पुढे आचार्य अत्रे यांच्या 'नवयुग' मध्ये लेखिका म्हणून काम करु लागल्या. त्यावेळेस आचार्य अत्रेसुध्दा शांताबाईंच्या विद्वत्तेने प्रभावित झाले होते. त्यानंतर त्यांनी अत्र्यांच्या 'समीक्षक' नियतकालिकाच्या संपादनाचे काम पाहिलं. "इथे पत्रकारितेच्या क्षेत्रात वावरल्यामुळे साहित्याच्या दृष्टीने ललित गद्य लेखनासाठी माझी मराठी भाषा साधीसोपी व सुबक झाली हे अत्र्यांचं माझ्यावर मोठं ऋण आहे." असं शांताबाई म्हणतात. निरनिराळ्या नियतकालिकांतून त्यांनी सदर लेखन केलं ती सदरं लोकप्रिय झाली. त्यानंतर मात्र शांताबाईंची खरी प्रतिमा समाजासमोर आली ती प्रतिभावान कवयित्री आणि गीतकार म्हणून. 'जाईन विचारीत रानफुला, तोच चंद्रमा' अशी अनेक भावगीतं, जिवलगासारख्या विराणीपासून 'पदरावरती जरतारीचा मोर नाचरा हवा' या ठसकेबाज लावणीपर्यंत शांताबाईंची लेखणी काव्य-गीत लेखनाचे सगळे पदर उलगडताना दिसते. 'वर्षा', 'रुपसी', 'तोच चंद्रमा', 'गोंदण', 'अनोळख', 'कळ्यांचे दिवस', 'फुलांच्या राती', 'जन्मजान्हवी' इत्यादी अनेक लेख काव्यसंग्रह आणि 'चिमणचारा', 'थुई थुई...', 'टिपटिप चांदणी, वाऱ्याचा रंग' हे बालगीत संग्रह प्रसिध्द झाले आहेत.



शांताबाईंना जसा मांजरी पाळण्याचा छंद होता तसा चित्रकलेचाही होता. शांताबाईंचे अजून एक वैशिष्ट्य सांगायचे तर हे तारांकित व्यक्तिमत्त्व अतिशय स्नेहशील असं होतं. साधेपण त्यांनी जपलं होतं. 'कै. यशवंतराव चव्हाण पुरस्कार', 'कुसुमाग्रज पुरस्कार' 'सु. ल. गद्रे मातोश्री पुरस्कार', 'सरस्वती चोगले साहित्य पुरस्कार' इत्यादी अनेक पुरस्कार त्यांना प्राप्त झाले. उत्कृष्ट गीतलेखनाचा 'गदिमा' हा मानाचा पुरस्कारही त्यांना मिळाला. आळंदीच्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षस्थान त्यांनी भूषविले. 'असेन मी नसेन मी' या काव्य पंक्ती रसिकांच्या मनात गुंजन करीत असतानाच ६ जून २००२ रोजी त्यांनी या जगाचा निरोप घेतला.

❖❖❖

# किट्टी

चित्रांकन व लेखन :
अजय कालडा







मोंटू तू सजावटीसाठी काय काय साहित्य आणलं आहेस ?
अरे वा ! किती सुंदर सुंदर वस्तू आणल्यास तू !
चला आपण आपला वर्ग सजवूया !
मोंटू मला मिठाई दे ना !
हो, घे ना.
आज संध्याकाळी आपण सर्व मिळून नाताळ साजरा करुया.
हो हो, खूप मज्जा येईल.


संध्याकाळी तुम्ही सर्वजण माझ्या घरी या. आपण सर्वजण तिथंच नाताळ साजरा करुया.
आपण फटाकेसुध्दा फोडूया.
नाही, फटाके फोडायचे नाहीत. यावर्षी प्रदूषणरहित नाताळ साजरा करायचाय.
आम्ही सर्वजण आलो आहोत किट्टी.
किट्टी, चल आपण सर्वजण मिळून दिवे लावूया.
चल चिंटू आपण गुपचूप बाहेर जाऊन फटाके फोडूया
हे सर्व ठीक आहे पण हे किट्टीला कळता कामा नये.


फटाके फोडू नका म्हणून मी तुम्हाला सांगितलं होत ना!
किट्टी! पण फटाके फोडल्याशिवाय नाताळची मज्जा कशी येणार?
आम्हाला मॅडमने सांगितलं होतं ना फटाके लावल्याने वातावरण प्रदूषित होतं आणि धुराने आजार फैलावतो.
किट्टी! तुझं बरोबर आहे. आपण दिवे लावूनच सर्वत्र रोषणाई करु या.






# खरी शिकवण मिळाली

ही एक जुनी कथा आहे. त्यावेळी स्वस्ताई होती. वर्तमानपत्रं एक रुपयाला मिळत असत. असंच एक गाव होतं समुद्राकाठी वसलेलं. त्या गावात रामभाऊ नावाचे एक सद्गृहस्थ राहत असत. त्यांचे किराणा मालाचे व वृत्तपत्राचे दुकान होते. अत्यंत प्रामाणिक व सज्जन म्हणून संपूर्ण गावात त्यांची ख्याती होती. एकदा त्या गावात शहरातून एक मनुष्य रहायला आला. तो स्वत:ला जरा शहाणा समजत असे. थोड्याच दिवसांत रामभाऊंची ख्याती त्याच्या कानावर गेली. एके दिवशी त्यांची परीक्षा घेण्याचे ठरवून त्याने एक वर्तमानपत्र त्यांच्याकडून विकत घेतले व बदल्यात एक रुपयाचे खोटे नाणे त्यांच्या हातावर ठेवले. रामभाऊंनी ते उचलून खिशात ठेवले व हसतमुखाने त्याला निरोप दिला.

आता हा त्याचा रोजचाच धंदा झाला. रोज वर्तमानपत्र घ्यावे आणि बदल्यात एक खोटे नाणे द्यावे. या बावळट माणसाला मी सहज फसवतो,

(पान ४४ वर)



कथा

# चांगली अद्दल घडली

दामू लोहार खूप आळशी आणि थापाड्या होता. थापा मारुन तो लोकांकडून पैसे उकळायचा. एकदा तो फिरत फिरत एका गावात पोहचला. तिथली माणसं खूप घाबरलेली आणि चिंताग्रस्त दिसली. त्यातील एका माणसाने दामूला सांगितले, की या गावाजवळच्या जंगलात एक अस्वल राहतं. ते केव्हाही गावात शिरुन लोकांना मारतं. दामू म्हणाला, "एवढंच ना, मग त्यात काय घाबरायचं ! मी आहे ना." दामूच्या बोलण्याने सर्वांना धीर आला. गावातील प्रमुख पुढे येत म्हणाले,"तुम्ही फार शूर दिसता, त्या अस्वलाच्या त्रासापासून आमची सुटका केली तर आम्ही गावकरी वर्गणी काढून तुम्हाला दहा हजार रुपये बक्षीस देऊ." दामू म्हणाला, "पण माझी एक अट आहे, बक्षीसाची रक्कम तुम्हाला आधी द्यावी लागेल." सर्वांचा नाइलाज झाला. त्यांनी वर्गणी

गोळा करुन दामूला दहा हजार रुपये दिले; पण अस्वलाला खरंच मारले की नाही हे कळण्यासाठी त्यांनी त्याला अस्वलाचे केस आणून दाखवायला सांगितले आणि सोबत गणू पैलवानालाही पाठवले. दामू मोठ्या ऐटीत कुऱ्हाड खांद्यावर घेऊन निघाला. जंगलात प्रवेश केल्यावर मात्र त्याला भीती वाटू लागली. पैसे घेऊन पळूनही जाता येत नव्हते. सोबत पैलवान होता. आता काय करावे? तेवढ्यात झाडीतून अस्वलाचे गुरगुरणे ऐकू आले.ते ऐकून दामू कुऱ्हाड टाकून पटकन झाडावर चढला. पैलावानाला मात्र झाडावर चढता आले नाही. तेवढ्यात त्याला आठवलं, की अस्वल मेलेल्या माणसाला खात नाही. तो तिथेच जमिनीवर मेल्यासारखा निपचित पडून राहिला. अस्वल पैलवानाजवळ आले. त्याच्या तोंडाजवळ हुंगून ते निघून गेले. अस्वल गेल्यावर दामू झाडावरुन खाली उतरला. त्याने पैलवानाला विचारले, "अस्वलाने तुला कानात काय सांगितले?" पैलवान म्हणाला, "अस्वल म्हणाले की माझे केस हवे असतील तर आधी मला पकडून दाखव आणि त्या थापाड्या दामूला शंभर फटके मारुन जंगलात आणून सोड." आता मात्र दामू पैलवानाच्या हातापाया पडून गयावया करत म्हणाला, "पैलवान, मला वाचवा हे पैसे परत घ्या. पाहिजे तर आणखी पैसे देतो पण मला जाऊ द्या." पैलवान हसत म्हणाला,"जा निघ लवकर, नाही तर गावकरी तुला खरच जंगलात नेऊन सोडतील."

दामूला चांगलीच अद्दल घडली. थापा न मारता कष्टाने पैसे कमवायचे असा निश्चय करत तो घरी परतला.

❖❖❖

## खरी शिकवण मिळाली (पान ४२ वरुन)

अशी फुशारकी तो स्वत:शीच मारत असे. एके दिवशी असे झाले की त्या माणसाला सकाळी लवकर शहरात जायचे असल्यामुळे तो दुकानावर आला, वर्तमानपत्र घेतले आणि चुकून खरे नाणे रामभाऊंना देऊन घाईघाईने निघून गेला. तो बस स्टँडवर पोहचण्याच्या बेतातच होता की मागून रामभाऊंना पळत येत असलेले पाहून तो थबकला. रामभाऊ त्याच्याजवळ आले आणि म्हणाले," मला खोटे नाणेच द्या!" हे ऐकून तो माणूस चांगलाच खजील होऊन म्हणाला," रामभाऊ माफ करा. पण मी आपणांस खोटे नाणे देत होतो हे आपणांस ठाऊक होते, तर आपण मला ते परत का करत नव्हता?" रामभाऊ थोडेसे हसून म्हणाले, "भल्या माणसा तू दिलेले खोटे नाणे मी परत केले असते तर तू ते अजून कोणाला तरी चलाखीने दिले असतेस. ज्याच्याजवळ हे नाणे गेले असते त्याने तुला मनातून शापच दिले असते. ते नाणे दुसऱ्या कोणाला देईपर्यंत त्याला चैन पडली नसती. शिवाय पुढे ज्या व्यक्तिला त्याने ते नाणे दिले असते त्याने पुन्हा याला शापच दिला असता. असे हे दुष्टचक्र शेवटपर्यंत चालूच राहिले असते. त्याऐवजी मी तुझ्याकडून ते गुपचुप घेत असे व समुद्रात नेऊन टाकत असे. त्यामुळे रोज माझे एका रुपयाचे नुकसान होत असे खरे; पण कितीतरी माणसांच्या मनात क्रोध, भीती, तिरस्कार असे नकारात्मक भाव जागृत होण्याचे टळत असे." हे बोलणे ऐकून त्या माणसाला मेल्याहून मेल्यासारखे झाले. त्याने आतापर्यंतचे सर्व पैसे रामभाऊंना दिले व शिल्लक राहिलेली सर्व खोटी नाणी समुद्रात फेकून दिली.

❖❖❖





# सोलापूर

मुख्यालय : सोलापूर

क्षेत्रफळ : १४,८४५ चौ. कि. मी.

तालुके : उत्तर सोलापूर (सोलापूर), दक्षिण सोलापूर (भंदुप ), अक्कलकोट, मोहोळ, सांगोला, मंगळवेढा, बार्शी, माळशिरस, पंढरपूर, करमाळा, माढा

सीमा : पश्चिमेस - पुणे, सातारा, सांगली जिल्हा
उत्तरेस - अहमदनगर, उस्मानाबाद जिल्हा
पूर्वेस - उस्मानाबाद जिल्हा
दक्षिणेस - सांगली जिल्हा व कर्नाटक राज्य

नद्या : मुख्य नदी भीमा. ह्याच नदीला पंढरपूरजवळ 'चंद्रभागा' या नावाने ओळखले जाते. याशिवाय बोरी, सीना, माण व नीरा इ. नद्या.

खनिजे : बांधकामासाठी लागणारा दगड.

प्रमुख शेतकरी उत्पादने : ज्वारी हे मुख्य पीक. बाजरी, कापूस, भूईमूग, ऊस.

धरणे : उजनी धरणाचा फायदा या जिल्ह्यास होतो.

विशेष माहिती :

- सोलापूर शहर चादरीसाठी प्रसिध्द आहे.
- कमी व अनियमीत पर्जन्यामुळे हा जिल्हा दुष्काळी जिल्हा म्हणूनच ओळखला जातो.
- सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट येथे श्री स्वामी समर्थ यांची समाधी आहे. अक्कलकोट हे पूर्वी संस्थान होते. तेथे राजवाडा व ऐतिहासिक इमारती आहेत. महाराष्ट्रातील प्रथम दर्जाचे शस्त्रागार येथील राजवाड्यामध्ये आहे.





- संतांच्या पदस्पर्शाने पावन झालेले पंढरपूर येथील श्री विठ्ठल हे साऱ्या महाराष्ट्राचे कुलदैवत आहे.
- सोलापूर जिल्ह्यात बार्शीपासून जवळ डोंगराच्या गुहेत रामलिंगाचे निसर्गरम्य स्थान आहे. या ठिकाणी दाट झाडी आहे. रामलिंग मंदिराभोवती कोरीव लेणी खोदलेली आहेत.



- महाराष्ट्राचे प्रसिध्द लावणीकार राम जोशी यांचा जन्म सोलापूरातच झाला. पेशवाईच्या अखेरीस बाजीरावाच्या कारकीर्दीत ते आपल्या असामान्य काव्य प्रतिभेमुळे सर्व मराठी मुलखात प्रसिध्द होते. युध्दकाळात चीनमध्ये जाऊन तेथील रुग्णांची आणि गरिबांची सेवाशुश्रूषा करीत प्रार्णापण करणारे डॉ. द्वारकानाथ शांताराम कोटणीस हे सोलापूरचे महान सुपुत्र होते.

**प्रेक्षणीय स्थळे** :- सिध्देश्वर मंदिर, मोतीबाग तलाव, हुतात्मा स्मारक

मंगळवेढा :- संत चोखामेळा व संत दामाजीपंत यांच्या समाधी

२००४ मध्ये सोलापूर येथे नव्याने विद्यापीठ स्थापन करण्यात आले. या विद्यापीठाचे पहिले कुलगुरु डॉ. इरेश स्वामी यांची नेमणूक करण्यात आली.

बार्शी :- भगवंत मंदिरामुळे 'भगवंताची बार्शी' असेही म्हणतात.

मोडलिंब :- मिरचीची बाजारपेठ म्हणून प्रसिध्द .

कुडल :- भीमा व सीना नदीचे संगम स्थान.

कुर्डुवाडी :- प्रमुख रेल्वे जंक्शन, वाहतुकीचे केंद्र.

नान्नज :- माळढोक पक्षी अभयारण्य

**सोलापूर जिल्ह्यातून जाणारे राष्ट्रीय महामार्ग** :-

पुणे - सोलापूर - हैदराबाद राष्ट्रीय महामार्ग

सोलापूर - विजापूर राष्ट्रीय महामार्ग,

सोलापूर - सुरत राष्ट्रीय महामार्ग

❖❖❖



# आपलं तिकडं लक्ष नसतं



संकटाला कधी टाळायचं नसतं
त्याला सामोरं जायचं असतं



कुणी नाव ठेवलं तरी थांबायचं नसतं
आपलं चांगलं काम रेटायचं असतं

अपयशाने कधी खचायचं नसतं
जिद्दीचं बळ वाढवायचं असतं



नाराज मुळी व्हायचं नसतं
चैतन्य सदा फुलवायचं असतं

पाय ओढले म्हणून परतायचं नसतं
पुढे आणि पुढेच जायचं असतं

लोकनिंदेला कधी घाबरायचं नसतं
आपलं सामर्थ्य दाखवायचं असतं



जीवनात खूप करण्याजोगं असतं
आपलं फक्त तिकडं लक्ष नसतं

- मधुकर शिंदे
कोल्हापूर



# सामान्य ज्ञान



१. जय जवान जय किसान ही घोषणा कोणी दिली ?
अ) म. गांधी  ब) म. फुले  क) लालबहादुर शास्त्री  ड) पं. नेहरू

२. आंतरराष्ट्रीय विकलांग दिन कोणत्या तारखेला साजरा करतात ?
अ) ३१ डिसेंबर  ब) १३ डिसेंबर  क) १० डिसेंबर  ड) ३ डिसेंबर

३. भारतातील सर्वोच्च नागरी सन्मान कोणता ?
अ) भारतरत्न  ब) पद्मश्री  क) पद्मभूषण  ड) पद्मविभूषण

४. चंद्र दररोज आदल्या दिवशीच्या वेळेपेक्षा किती मिनिटे उशिरा उगवतो ?
अ) ३ मिनिट  ब) ५ मिनिट  क) २ मिनिट  ड) दीड मिनिट

५. मौलाना अबुल कलाम आझाद यांनी कोणते वर्तमानपत्र सुरु केले ?
अ) अल-हिलाल  ब) यंग इंडिया  क) वंदे मातरम्  ड) न्यू इंडिया

६. लक्ष्मणाने माता सीतेला कोणत्या ऋषींच्या आश्रमात सोडले ?
अ) विश्वामित्र  ब) वाल्मिकी  क) अत्रि  ड) मतंग

७. भारतातील क्षेत्रफळाने सर्वात मोठे राज्य कोणते ?
अ) मध्यप्रदेश  ब) महाराष्ट्र  क) राजस्थान  ड) प.बंगाल

८. महाराष्ट्रातील कोणत्या भागात कृत्रिम पाऊस पाडण्याची आवश्यकता भासते ?
अ) विदर्भ  ब) मराठवाडा  क) कोकण  ड) खानदेश

९. १०४ उपग्रह एकाच वेळी अग्निबाणाच्या सहाय्याने अवकाशात प्रक्षेपित करण्याचा विक्रम कोणत्या देशाने केला आहे ?
अ) रशिया  ब) चीन  क) भारत  ड) अमेरिका

१०. संत निरंकारी मिशनच्या स्थापनेला किती वर्षे पूर्ण झाली ?
अ) ७०  ब) ८०  क) ९०  ड) १००

उत्तरे इतरत्र

# लाजाळू रानकवडा



हा कबुतराच्या प्रजातीतीलच; परंतु अगदी वेगळा दिसणारा रानकवडा. याला इंग्रजीत 'ओरिएंटल टर्टल डव्ह' असं म्हणतात. या प्रजातीच्या दोन उपजाती आहेत, त्या म्हणजे सायबेरियन आणि एशियन. हा काहीसा कवडा या पक्ष्यासारखा दिसतो. हा पक्षी आशिया खंडात आढळतो. विशेषतः उंच पर्वतराजीतच आढळणारा हा पक्षी भारतात हिमालयाच्या पायथ्याशी आणि तेथील पर्वतरांगांमध्ये आढळतो. मी छायाचित्र काढलेला हा रानकवडा मला समुद्रसपाटीपासून २५०० मीटर उंचीवर असलेल्या पंगोट येथे आढळला. शिकारीमुळे आणि अधिवास नाहिसा झाल्याने आता पक्ष्यांची ही प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहे.

हा पक्षी आकाराने कबुतरापेक्षा मोठा असतो. बांबूची वनं, घनदाट जंगलं, दाट झाडी असणाऱ्या ठिकाणी या पक्ष्याचं वास्तव्य दिसून येतं.हा विशेषतः उंच झाडीत आढळतो. अतिशय लाजाळू स्वभावाचा हा रानकवडा सहसा मनुष्यवस्तीत आढळून येत नाही. साधारण ३३ सेंटीमीटर लांबीचा हा पक्षी लालसर-तपकिरी रंगाचा असतो. याच्या मानेवर दोन्ही बाजूला काळ्या व पांढऱ्या रंगाच्या रेषा असतात. ही रचना ही मध्यम आकाराच्या खवल्यांप्रमाणे दिसते. एकावर एक अशाप्रमाणे सुंदर अशा काळ्या-तपकिरी-मातकट रंगसंगतीतली ही :. रचना खूप सुंदर दिसते. या रचनेमुळेच या पक्ष्याला ''टर्टल डव्ह' असं म्हणतात. याचे लाल-तांबड्या रंगाचे डोळे गुंजेप्रमाणे दिसतात.

गुर गुर गुरगू' असा रडका आवाज काढणाऱ्या या पक्ष्याचा आवाज कबुतराप्रमाणेच घुमत राहतो. रानकवडा नेहमी समूहात राहतो. अनेकदा जोडीने किंवा छोट्या थव्यात हे पक्षी दिसून येतात. हा पक्षी थंड हवामानात उबदार ठिकाणी स्थलांतर करतो. स्थलांतराच्या वेळी मात्र या पक्ष्याचा मोठा थवा दिसून येतो. धान्य,गवताचे दाणे, फळं हे याचं मुख्य खाद्य आहे. या पक्ष्याची शारीरिक क्षमता जास्त असल्याने अतिशय थंड वातावरणातही हा तग धरू शकतो.

या पक्ष्याचं घरटं दाट झाडीत उंच ठिकाणी बांधलेलं असतं. मऊ गवत, काड्या व काटक्यांपासून हे आपलं घरटं बनवतात. प्रजनन काळात मादी दोन सफेद रंगाची अंडी घालते. या पिल्लांचं संरक्षण व संगोपन नर व मादी दोघं मिळून करतात.

❖❖❖

# चित्र काढा आणि रंग भरा



## सामान्यज्ञान उत्तरे

१. क
२. ड
३. अ
४. ब
५. अ
६. ड
७. क
८. ब
९. क
१०. क

## शब्दकोडे ७८५

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ म | हा | २ रा | ष्ट्र | | ३ सा | |
| हा | | ष्ट्र | | ४ भो | स | ले |
| ५ भा | क्रा | | ६ ती | | रा | |
| र | | ७ मे | न | ८ का | | ९ स |
| १० त | ११ रु | ण | | सा | | न |
| | प | | १२ सा | र | १३ ना | थ |
| १४ द | या | नं | द | | लं | |
| त्त | | | १५ र | क्त | दा | न |

।। १ तू ही निरंकार ।।

कृपावंत तू होसी ज्यावर त्याच्या जीवनी येई बहार।
कृपावंत तू होसी ज्यावर त्याची कधी ना होई हार।
कृपावंत तू होसी ज्यावर पूजील त्याला हा संसार।
कृपावंत तू होसी ज्यावर होईल त्याचा जयजयकार।



शंकरराव जाधव
मुखी, वाई तालुका

## महालक्ष्मी

सर्वांसाठी... सर्वकाही... एकाच ठिकाणी...

लग्न बस्त्याची खास सोय ।



अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन

**THE COMPLETE FAMILY SHOWROOM**

मनमोहक साडया । ड्रेस मटेरिअल । मेन्स वेअर । चिल्ड्रन्स वेअर । लेडीज वेअर । सुटींग शर्टींग । रेमण्ड सियारामचे विक्रेते

गुरु के दर्शन भक्तजनों को आनंद से भर देते है। गुरु के दर्शन मन की सारी दुविधा को हर लेते है।
गुरु के दर्शन जन्म जन्म के सोये भाग जगाते हैं। गुरु के दर्शन जो करते हैं धन धन वो हो जाते हैं।

सद्‌गुरु होता जग का दाता जो चाहे कर सकता है
पत्थर दिल भी गर पैरों को छुले भवसागर तर सकता है

९९९, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)
फोन नं. : 9766727262 / 8999859073

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2019-2021
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2019
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month

